मे १९६२

पन्नास नये पैसे



ऊठ ऊठ सह्याद्रि, घुमवित बोल मराठी खडे,
समतेचें हें तुफान उठलें; उठले सागर-कडे.
स्वतंत्रतेचा मंत्र जयांना गर्भामध्ये मिळे;
तेच मराठे आम्ही; आम्ही सह्याद्रीचे सुळे

—विंदा करंदीकर

माणूस
मराठी मासिकपत्र

संपादक
श्री. ग. माजगांवकर

• • •

पत्रव्यवहाराचा पत्ता
संपादक, व्यवस्थापक
'माणूस,' मराठी मासिक
४१९ नारायण पेठ, पुणें २.

* * *

वार्षिक वर्गणी : पांच रुपये
किरकोळ अंक : पन्नास नये पैसे

• •

— सूचना —
१. प्रकाशित लेख, चित्रें इत्यादि बाबतचे सर्व हक्क स्वाधीन.
२. पुरेसें पोस्टेज सोबत नसल्यास नापसंत साहित्य लगेच निकालांत काढलें जातें.
३. या मासिकांत व्यक्त झालेलीं मतें 'माणूस' मासिकाच्या चालकांचीं अधिकृत मतें असतातच असें नाहीं.

अभिराष्ट्रेण वर्धताम्




वर्ष पहिलें : मे १९६२ : अंक बारावा

# स्वरूप–दर्शन

— सामाजिक अंतरंग —

लोकशाही विकेंद्रीकरण कां व कसें–– – संकलन

लोकशाही विकेंद्रीकरण– एक विचार–– – श्री. ग. माजगांवकर

— साहित्य विभाग —

मला दिसलेले लेखक ... ... वि. स. खांडेकर. – 'मी'
भारजी ... ... ललित ठोंबरे.
आनंद यात्री ... ... सुधाकर जोशी.
स्पर्श (कविता) ... ... रमेश ललगूणकर.
सुंदर पत्रें ... ... श्री. वा. काळे.
नाहि चिरा नाही पणती ... ... के. ल. जोग.

— रंगभूमि, क्रीडा —

'सेतु' बंगाली नाटचपरिचय ... ... बाळासाहेब जोशी.
'एक दिवटी पांच बुधले' ... ... परीक्षण.
मोटार सायकल स्पर्धा ... ... विद्याधर.

बुद्धिबळाच्या पटावर, विनोदी चित्रमालिका, पुस्तक परीक्षण, इत्यादि आकर्षक सदरें.

मुखपृष्ठ — नवमहाराष्ट्र स्वागत. – मा. द. शिंदे.

# लोकशाही विकेंद्रीकरण-एक विचार-

श्री. ग. माजगांवकर

ज्या योजनांमुळे जनतेचें जीवनमान सुधारणार आहे, जनतेच्या सुखसोयींत वाढ होणार आहे, त्या योजनांशी जनतेने सहकार्य करूं नये ही गोष्ट सकृद्दर्शनी मनुष्य स्वभावाच्या विरुद्धच नाहीं कां ? पण विकासयोजनांच्या बाबतींत हा अनुभव गेलीं १०।१२ वर्षे आपल्याकडे सर्वत्र येत आहे. प्रत्येक सरकारी वा बिनसरकारी अहवालांतून ही गोष्ट दिसून आलेली आहे, की सर्वसामान्य जनता या योजनांविषयी उदासीन आहे. या अडचणींतून कांही मार्ग निघावा, जनतेने या विकास-योजनांशी सहकार्य करावें, सध्याप्रमाणे केवळ सहकारी यंत्रणेच्या बळावर त्या दामटल्या न जातां लोकांनी पुढे येऊनच त्या यशस्वी कराव्यात या हेतूने गेलीं दोन वर्षे देशांत अनेक राज्यांतून विकेंद्रीकरणाचे नवे प्रयोग सुरू झालेले आहेत. महाराष्ट्रांतहि आता या महिन्यापासून या महत्त्वाच्या कालखंडाला प्रारंभ होणार आहे. प्रश्न असा आहे की, अपेक्षित तें जनतेचें पुढारीपण या प्रयोगांतून जन्मास येणार आहे का ? का केवळ हा सरकारी यंत्रणेच्या सुधारणेचा प्रयत्न आहे ? यंत्रणा सुधारली तर आजच्यापेक्षा विकासकार्याचा वेग थोडा वाढेल हें खरें; दोन-चार लहान-मोठ्या स्थानिक योजना लवकर अमलांत येतील. पण यापेक्षा कांहीतरी अधिक घडावें, लोकजागृतीचें एक नवें पर्व यांतून निर्माण व्हावें अशी आपली अपेक्षा आहे. ती या विकेंद्रीकरणामुळे कितपत साध्य होणार आहे यावरच या प्रयोगाचें यशापयश मोजून पाहणें केव्हाहि श्रेयस्कर ठरणार आहे.

## अनुरंजन आणि जागृति

या दृष्टीने विचार करतांना एक गोष्ट फार तीव्रतेने खटकते. आपल्याकडे " जनता " हा शब्द फारच मोघम, भाबडया व उथळ अर्थाने सरसहा वापरण्याची एक अशास्त्रीय सवय लिहिण्याबोलण्यांत रूढ होऊन बसली आहे. त्यामुळे जनजागृति म्हणजे काय, ती कोणीं व कशी साधावयाची असते, तिचें उद्दिष्ट काय यासंबंधी वस्तुनिष्ठ दृष्टिकोन न स्वीकारतां आपण जनतेच्या अवास्तव अनुरंजनालाच " जागृति " समजून अपेक्षित यश त्यातून कां निर्माण होत नाही म्हणून संभ्रमांत पडतों. वास्तविक असंघटित व अप्रबुद्ध जनता केवळ आपल्या संख्येच्या जोरावर कोणतेंहि महत्कार्य सिद्धीस नेऊं शकत नाही असा इतिहासाचा अनुभव आहे. कांही विशिष्ट ध्येयदृष्टीने भारलेल्या व्यक्ति वा संघटना आपल्या अचल श्रद्धेच्या आणि असीम परिश्रमाच्या अग्नीने जेव्हा जनतेच्या शक्तिवृद्धि प्रदीप्त करतात तेव्हाच हा प्रचंड समाजपुरुष जागा होतो व इतिहासांत अजरामर ठरावें असें एखादें परिवर्तन घडून येतें. प्रभू रामचंद्राचें दर्शन घडेपर्यंत तो महारुद्र हनुमान अरण्यांतील इतर वानरगणांप्रमाणेच नाही का वृक्षांवृक्षांवरून उडया मारण्यांत आपलें प्रचंड सामर्थ्य वेचीत होता ? त्याच्या डोळ्यांदेखत लंकाधिपति रावणाच्या राक्षससेना ऋषिमुनींच्या यज्ञवेदी उद्ध्वस्त करीत होत्या; अनेक स्वर्गस्थ देवगण रावणाच्या बंदिखान्यांत कोंडले गेले होते; अनेक आर्यस्त्रिया भ्रष्टविल्या जात होत्या. पण या साऱ्या अन्यायांची व अत्याचारांची जाणीवहि या वानरगणांना नव्हती. ती निर्माण झाली प्रभु रामचंद्राच्या दंडकारण्य-प्रवेशामुळे; आणि मग शक्तिवृद्धि एकवटल्या; नीति आणि गति यांचा संगम झाला; सागरावर सेतू बांधले गेले; प्रचंड द्रोणागिरी हलले; अन्यायांचें परिमार्जन झालें; न्यायाची संस्थापना झाली; रामराज्याची गुढी उभारली गेली.

कुठूनहि आणि कसाहि पैसा उभा करून विकास साधणें हा विकेंद्रीकरणाचा हेतु नसून काटकसरीने व कार्यक्षमतेने स्थानिक साधनसामग्री राबवून लोकांना कार्य-प्रवृत्त करणें व यांतून सामाजिक नेतृत्वाची जोपासना करणें असा हा गतिमान विचार आहे.

स्थानिक साधनसामग्री व सर्वसाधारण जनतेची सुप्त श्रमशक्ति यांची सांधेजोड साधणारी समर्थ लोकसंघटना निर्माण झाल्याखेरीज लोकशाही विकेंद्रीकरणाचा मूळ उद्देश सफल होणें कठिण आहे.

ज्याचा ध्येयवाद नव्या काळाची ग्वाही देतो, ज्याची संघटना त्यागी कार्यकर्त्यांच्या नैतिक बळावर उभी आहे असा एखादा पक्ष सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचून तेथे लोकजागृतीचें कार्य करीत नाही तोंपर्यंत शासनविषयक सुधारणा कितीहि केल्या तरी अपेक्षित असें लोककर्तृत्व येथे फुलणार नाही ही गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे. आधुनिक काळांत चीनमध्ये मोठया प्रमाणांत असें लोककर्तृत्व निपजलें व तेथील अनुभवावरूनच आपल्या योजनाकारांना जनतेच्या सहकार्याची निकड अधिक तीव्रतेने भासूं लागली. परंतु तेथील कम्युनिस्ट पक्षाची जागा घेणारा एखादा पक्ष वा संघटना भारतांत सिद्ध नसतांना आपणाकडे त्या प्रमाणांत हा प्रयोग यशस्वी होईल ही अपेक्षा बाळगणें चूकच नाही का? सत्ताधारी कांग्रेसपक्ष जनतेशी संपर्क ठेवून असला तरी ध्येयवादी, प्रामाणिक व निष्ठावंत कार्यकर्त्यांची त्यांत उणीव आहे. इतर पक्षांचा जनतेशी केवळ निवडणुकांपुरताच संबंध येतो. "जनता" हा शब्द प्रत्येकाच्या तोंडीं. कोणी शेतकऱ्याला अस्मानांत चढवितो तर कोणी कामगाराला अश्वारूढ करतो. परंतु सामाजिक जीवनाची पातळी उंचावणारे, जनतेला कर्तव्याची जाणीव देणारे, त्याग आणि साहसाला प्रवृत्त करणारे जबाबदार व विधायक नेतृत्वाचे आदर्श जनतेसमोर कोणीहि उभे करीत नाही. अशा नेतृत्वाला प्रसंगीं जनतेची नाराजीहि पत्करून कर्तव्याची शिकवण देण्याचें कार्य करावें लागतें. परंतु हें नाराजी पत्करण्याचें कटु कर्म या लोकशाहीच्या राजकारणांत सहसा कोणीच करीत नसल्याने लोकानुनयाखेरीज मार्ग उरत नाही. प्रश्न आहे तो हाच की, या लोकानुनयाला आपण लोकनेतृत्व मानणार काय?



## सव्वीस नवीन ग्रामीण नगरपालिका

विकेंद्रीकरणामुळे जनतेच्या हातीं सत्ता येईल व ही सत्ता राबविण्यासाठी योग्य तें नेतृत्व जनताच पुढे फेकेल ही समजूतहि बरोबर नाही. आज पुणे-मुंबई इत्यादि ठिकाणीं महानगरपालिकांच्या हातीं सत्ता आहे. गेल्या १०-१५ वर्षांत या नगरपालिकांनी कोणत्या नव्या नेतृत्वाला जन्म दिला? सामाजिक व नागरिक नीतीचें कोणतें नवीन वळण लावलें? विकेंद्रीकरणामुळे अस्तित्वांत येणाऱ्या जिल्हा परिषदांची यंत्रणा व अधिकार या महानगरपालिकांप्रमाणेच आहेत. किंबहुना असें म्हटलें तरी चालेल की, विकेंद्रीकरणामुळे महाराष्ट्रांत नवीन सव्वीस ग्रामीण नगरपालिका अस्तित्वांत येत आहेत. पुण्या-मुंबईसारख्या यापूर्वी अस्तित्वांत असणाऱ्या, थोर परंपरा पाठीशी बाळगणाऱ्या महानगरपालिकांकडून जर नव्या नेतृत्वाचा प्रश्न सुटत नाही तर नव्यानेच अस्तित्वांत येणाऱ्या या ग्रामीण नगरपालिकांकडून तो आपोआप सोडविला जाईल ही अपेक्षा बाळगणें कितपत योग्य ठरेल? ग्रामीण समाज हा शहरी समाजापेक्षा उपजत व निसर्गतःच चांगला आहे अशी सर्वोदयी धारणा बाळगली तर गोष्ट वेगळी! पण एरव्ही दोन्ही ठिकाणच्या कारभारांत कांही मौलिक फरक दिसतील असें वाटत नाही.

## राजस्थान व आंध्र येथील प्रयोग

राजस्थान, आंध्र या प्रदेशांतून यापूर्वी विकेंद्रीकरणाचा प्रयोग सुरू झालेला आहे. या ठिकाणचे अनुभव काय सांगतात? साऱ्या देशांत ज्या प्रवृत्ती आहेत त्यांचेच प्रतिबिंब विकेंद्रीकरणामुळे खेडयापाडयांत उमटलें हा या ठिकाणच्या अनुभवांचा सारांश आहे. श्री. आर्. के. पाटील यांच्या निरीक्षक समितीने यासंबंधी काढलेले कांही निष्कर्ष पाहाण्यासारखे आहेत. राजस्थानमध्ये पंचायत राज्याच्या

स्थापनेनंतर पंचायत समित्यांच्या कार्यकर्त्यांच्या मनांत जबाबदारीची व जनहिताची एक नवीन जाणीव निर्माण झाली होती ही गोष्ट या निरीक्षकसमितीने मान्य केली आहे. परंतु ग्रामपंचायतींनी वर मंजुरी-साठीं पाठविलेल्या योजनांना मान्यता देणें किंवा न देणें यापेक्षा जागृतीचें कोणतेंहि नवें प्रवर्तन या समित्यांकडून झालेलें नाही. समिति म्हणते 'वास्तविक एकट्या ग्रामपंचायतींना स्वतंत्रपणें हातीं न घेतां येण्याजोग्या क्षेत्रविकासाच्या योजना ( Area Plans ) कार्यवाहींत आणण्याची जबाबदारी काय-द्याने पंचायत समित्यांवर टाकलेली आहे. परंतु पंचायत समित्या ही जबाबदारी पार पाडीत नाहीत. अनेक ठिकाणीं ग्रामीण जनतेच्या उत्पादनक्षमतेंत सुधारणा करतील अशा पाणीपुरवठ्याच्या क्षेत्रयोजना आम्हास दाखविल्या गेल्या. परंतु पंचायत समित्यांच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतहि त्यांचा अन्तर्भाव झालेला नव्हता. यामुळे ग्रामपंचायतींनी हातीं घेतलेल्या योजनांना पैसे वांटप करणारी वरिष्ठ संस्था एवढेंच स्वरूप या पंचायत समित्यांना येथे प्राप्त झाल्यासारखें दिसतें. जुन्या विकासयोजनांपेक्षा हें स्वरूप कांही फारसें भिन्न आहे असें वाटत नाही. ( Report of a study team on Democratic Decentralisation in Rajastan P. 12 )

हातीं सत्ता आहे, साधनेंहि आहेत. मग ग्रामीण जनतेला हवीं असणारीं व देशाच्या उत्पादन-सामर्थ्यांत वाढ करणारीं पाणीपुरवठा योजनांसारखीं थोडीं धाडसाचीं व जबाबदारीचीं कामें पंचायत समित्यांनी अंगावर कां घेऊं नयेत ? उत्तर स्पष्ट आहे. नवें कसदार नेतृत्व विकेंद्रीकरणामुळे पुढे येईल ही अपेक्षा होती ती पूर्ण झालेली नाही. त्यामुळे शाळांच्या इमारती, दवाखाने, रस्ते इत्यादि बिन-धोक्याचीं जीं कामें ग्रामपंचायतींकडून वर आलीं तेवढीं उरकलीं गेलीं. तसेंच तगाईवांटप वगैरेंत सुधारणा झाली. परंतु 'स्थानिक उपक्रमशीलता' ( Local Initiative ) वाढली नाही. कारण 'उपक्रम' म्हटला की, त्यांत यशापयश आलें, धोका आला. जनतेशी घनिष्ट व आंतरिक जिव्हाळ्याचे सच्चे ऋणानुबंध असतील तरच असे धोके पत्करण्याचें नैतिक धैर्य पुढाऱ्यांच्या ठायीं निर्माण होतें. तें पंचायत राज्यांतील पुढाऱ्यांनी दाखविलें नाही, याचा अर्थच नव्या पातळीवरचें नेतृत्व तेथे उदयास आलें नाही असा होतो.

आंध्रमध्ये महाराष्ट्राप्रमाणेच जिल्हा परिषदांना अधिक महत्त्व देण्यांत आलेलें आहे. या ठिकाणचा अनुभव सांगतांना निरीक्षक समितीच्या आंध्र प्रदेशाच्या पाहणीच्या अहवालांत एके ठिकाणीं म्हटलें आहे,

The Zilla Parishad in Andra Pradesh is looked upon by non-official opinion as providing the least opportunity for participation in development activities. As one member of the Parishad *expressed himself, what work would they* have, after the non-Block areas are converted in to regular Blocks, except passing the budgets of *Panchayat Samities* and *distributing monies received from the* Govt. amongst them ? ( P. 33–34 ).

'विकास योजनांच्या कामांत पुढारीपण घेण्याच्या दृष्टीने आंध्र प्रदेशांतील जिल्हा परिषदांना केवळ नाममात्र संधि उपलब्ध आहे अशी एक जाणीव या परिषदांच्या सर्वसाधारण लोकप्रतिनिधींच्या मनांत घर करून बसलेली आहे. एकाने अगदी सहज शब्दांत ही जाणीव व्यक्त करतांना सांगितलें "एकदा जिल्ह्यांतील सर्व विभागांची गटवार पुनर्रचना झाली की, त्या त्या गटाच्या पंचायत समित्यां-कडून येणारीं अंदाजपत्रकें मंजूर करणें आणि वरून सरकारकडून आलेला पैसा या समित्यांना वांटून टाकणें या व्यतिरिक्त या परिषदांना कामच काय उरणार आहे ?" (पृ. ३३. ३४) "वास्तविक हा दृष्टिकोन बरोबर नाही. जिल्हा परिषदांना स्वतंत्रपणें अंगावर घेतां यावी अशा अनेक विकासयोजनांची जबाबदारी कायद्याने त्यांच्यावर टाकलेली आहे. किंबहुना अशा कामांची संख्या वाढावी, जिल्हा परि-षदांनी जिल्ह्यांतल्या सर्वांगीण विकासासाठी झटावें असाच तर विकेंद्रीकरण कायद्याचा मूळ उद्देश आहे. या दृष्टीने त्यांत महत्त्वाच्या तरतुदीहि करण्यांत आलेल्या आहेत. असें असतांना ही उदासीनता जिल्हा परिषदांवर निवडून आलेल्या सभासदांनी व्यक्त करावी हें कशाचें द्योतक आहे ? जें राजस्थानमधील पंचायत समित्यांच्या बाबतींत म्हटलें तें येथेहि जिल्हा परिषदांच्या बाबतींत खरें आहे. उद्या सर्वो-दयी विचारक सुचवितात त्याप्रमाणे सर्व प्रकारचीं साधनें व सत्ता थेट ग्रामपंचायतींच्या स्वाधीन केली तरी आज पंचायत समित्या किंवा जिल्हा परिषद यांच्या बाबतींत येणाऱ्या अनुभवांत बदल

घडणार नाही. कारण प्रश्न आहे तो मूळ समाजप्रवर्तनाच्या ध्येयदृष्टीचा व त्यासाठी अवश्य असणाऱ्या समर्थ लोकसंघटनेचा. जोंपर्यंत या गोष्टीचा आपल्याकडे अभाव आहे तोंपर्यंत विकेंद्रीकरणाचा मूळ उद्देश सफल होण्याची शक्यता कमी आहे. रस्ते, शाळा, विहिरी बांधल्या जातीलहि. निवडणुकांच्या धमाली माजतील. पण या सर्वांतून जनतेची सुप्त कार्यशक्ति व देशहिताच्या जबाबदारीची जाणीव जागृत होणार का ? 'नव्या नेतृत्वाच्या' यशापयशाची ही एकमेव कसोटी आहे. विकेंद्रीकरणाचाहि हा मूळ उद्देश आहे. नाईक समितीच्या शब्दांतच सांगायचें तर "स्थानिक नेतृत्वाला अधिक जबाबदारी स्वीकारण्याचें शिक्षण देणें आणि जरूर तेथे अग्रहक्क देऊन उपलब्ध साधनसामग्रींतून जास्तींत जास्त कार्यक्षमतेने व काटकसरीने आणि कमींत कमी त्रास होईल अशा रीतीने लोकांच्या वाढत्या गरजा भागविणे हेंच या विकेंद्रीकरणाचे मूलभूत उद्देश आहेत व आमच्या मतें विकेंद्रीकरणाचा खरा गाभाहि हाच आहे." (पृ. ५६). कुठलाहि, कसाहि पैसा जमा करून विकास साधणें हा हेतु नसून काटकसरीने व कार्यक्षमतेने स्थानिक साधनसामग्री राबवून लोकांना कार्यप्रवृत्त करणें व यांतून सामाजिक नेतृत्वाची जोपासना करणे असा हा गतिमान विचार आहे. स्थानिक साधनसामग्री व सर्वसाधारण जनतेची सुप्त श्रमशक्ति यांची सांधेजोड कोण साधणार हा खरा प्रश्न आहे आणि या प्रश्नाच्या उत्तरावरच विकेंद्रीकरणाच्या प्रयोगाचें यशापयश अवलंबून आहे.

●●●

## असा होता भारताचा नियोजन महर्षि

"भारतरत्न हा किताब स्वीकारण्यासाठी कै. विश्वेश्वरअय्या दिल्लीस गेले तेव्हा त्यांचा मुक्काम राष्ट्रपति भवनांत होता. किताबग्रहणाचा समारंभ झाला आणि दोन दिवस राष्ट्रपतींचा पाहुणचार घेऊन त्यांनी निरोप घेण्याची तयारी केली. दिल्लींतच कांही अधिक दिवस राहण्याचा त्यांचा मानस होता. त्यासाठी त्यांनी दिल्लींतील हॉटेलांत जागा ठरवून ठेवली होती. निरोपाचे वेळीं त्यांनी राष्ट्रपतींना आपण केवळ राष्ट्रपतिभवनांतील मुक्काम हलवीत आहोंत, दिल्ली सोडीत नाही असें सांगितलें. राष्ट्रपतींना आश्चर्य वाटलें. 'राष्ट्रपतिभवनांत कांही गैरसोय होते का ?' अशी त्यांनी सरळ मनाने विचारणा केली. सोयीगैरसोयीचा प्रश्नच नव्हता. ऋद्धिसिद्धि जेथे हात जोडूनच उभ्या असतात तेथे कसली आली आहे गैरसोय ? मग विश्वेश्वरअय्या मुक्काम हलविण्याची घाई कां करतात ? हें राष्ट्रपतींना समजेना. शेवटीं विश्वेश्वरअय्यांनीच जेव्हा कारण सांगितलें, तेव्हा भारताच्या या थोर सुपुत्राबद्दल राष्ट्रतींना वाटणार आदर शतगुणित झाला.

"प्रथमेच द्वितीयेच तृतीयेच दिने ऽ तिथिः देवभूतो, भारभूतो, शल्यभूतो भवेत् क्रमात्" हा श्लोक राष्ट्रपतींना ऐकवून विश्वेश्वरअय्या म्हणाले, "अतिथि पहिल्या दिवशीं यजमानाचा देव असतो. दुसऱ्या दिवशीं तो भारभूत होतो आणि तिसऱ्या दिवशीं तो शल्यासारखा टोचूं लागतो म्हणून अतिथीने तीन दिवसांपेक्षा यजमानाकडे अधिक राहूं नये असा एक भारतीय दंडक आहे."

राष्ट्रपतींच्या आग्रहाचा कांहीएक परिणाम न होतां सर विश्वेश्वरअय्यांनी आपला मुक्काम हलवण्याचा बेत तडीस नेला तो नेलाच.

●●●

हँडलूम विव्हर्स को. ऑप. प्रो. सोसायटी लि.
वडगांव
खास टोपीसाठी !! खास टोपीसाठी !!
खास टोपीसाठी लागणाऱ्या दो सुती
१२ × १२ खादीचे निर्माते
हँडलूम विव्हर्स को. ऑप. प्रो.
सोसायटी लि.
वडगांव, जि. कोल्हापूर

पांढरे डाग
अनेक बक्षिसें व हजारो अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रु. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.
नकली वैद्यांपासून सावध राहावें.
वैद्य बी. आर्. बोरकर
आयुर्वेद भुवन
मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)



# वि. स. खांडेकर

कोणत्याहि लेखकाविषयी लिहितांना त्याच्या काळांतच जाऊन लिहायला हवं हें आपल्या कोणत्याहि भारतीय लेखकाबद्दल खरं आहे. कारण आपल्या देशांतील जीवनाची गति जसजशी वाढत आहे तसतसं वाङमयाचं स्वरूपहि पालटत जात आहे. पांच पांच वर्षांच्या फरकानं लेखकांचे चेहरे अनोळखी वाटूं लागतात. ज्या लेखकांच्या बाबतींत हा फरक विशेष जाणवतो, त्यांतले खांडेकर एक आहेत.

खांडेकरांच्या लिखाणाकडे आजच्या काळांतून पाहिलं की, फारच गमंत वाटते. कला आणि जीवन हा वाद त्यावेळीं रंगला होता. खांडेकर जीवनवादी धरले गेले होते. पण त्यांचं तें जीवनवादी लिखाण, त्यांतलं स्वप्नाळू तत्वज्ञान, अशक्य माणसं, रोमँटिक ध्येयवाद, अति अलंकारिक भाषा या सर्वांमुळे जीवनापासून दूर वाटतें. उलट त्याकाळीं कलावादी असलेल्या फडके यांची भाषा, त्यांचीं पात्रं, पात्रांचीं गुंजनं आणि मर्यादित ध्येयं हीं सर्व आज जीवनांतलीं वाटतात. काळानं दोघांच्या भूमिका अशा उलटया केलेल्या पाहून जे कांही वाङ्मयीन वाद त्या त्या कालांत गंभीरपणानं नि हिरिरीनं खेळले जातात त्यांचं थोडं हसूं येतं.

पण आज जरी असं वाटत असलं तरी त्यावेळीं खांडेकरांचा ध्येयवाद जीवनवादी कां वाटला हें जाणून घेतलें पाहिजे. खांडेकरांच्या उपमा त्यावेळीं घरोघर तरुणांच्या तोंडीं होत्या. त्यांच्या पात्रांचे ध्येयवाद घरोघरीं चर्चिले जात होते. त्यावेळीं जे तरुण होते त्यांच्या रोजनिशींत खांडेकरांचीं वाक्यपुष्पें सुवाच्य अक्षरांत उतरलेलीं दिसतील.

त्या काळाचा तो महिमा होता. देश पारतंत्र्यांत होता. त्या जाणीवेनं तेव्हांची तरुणपिढी आजच्यापेक्षा जास्त संवेदनाशील नि भावनाप्रधान झालेली होती. पारतंत्र्य, निरक्षरता, धर्मभोळेपणा, बेकारी,— अस्पृश्यता इत्यादि प्रश्नांचा बोजा तरुण पिढीवर फार होता. इंग्रजी सत्ता सर्वांआड येत होती. ती सत्ता घालवण्यासाठी कुणी यशाचा उपाय काढला तरी तो स्वागतार्ह होता. पण जखडून गेलेल्या त्या स्थितींत कांही प्रत्यक्ष करतां येणें बहुतेकांना अशक्य असल्यानं जें हवं तें कल्पनेंत पाहाण्याची वृत्ति झाली होती. कल्पनेची ही भूक खांडेकरांनी शमवली. त्यांनी सर्वस्व सोडून सेवेसाठी बाहेर पडलेल्या तरुणाला नायक केलें. ध्येयवादी स्त्रिया रंगवल्या. प्रेम जुळविलें, पण ध्येयासाठी, विवाहापासून त्यांना अलग ठेवलें. जें आपल्याला करतां येत नाही तें करणारे खांडेकरांचे नायक तरुणांना आवडले यांत नवल नाही.

खांडेकरांचं लिखाण डोळ्यापुढं आणलं की वाटतं, हा माणूस सदा चिंतनांत असावा. पृथ्वीगोलावर बसून हनुवटी हातावर टेकून स्वारी पृथ्वीच्या नि विश्वाच्या चिंतनांत मग्न आहे. त्यांच्यापुढे सारखीं प्रश्नचिन्हें आहेत. जगाचें काय? माणसाचें काय? कोणतीहि व्यक्ति त्यांना व्यक्ति म्हणून कधी रंगवतां आलेली नाही. याचें कारण समष्टीच्या रिंगणांतच व्यक्तीला पाहण्याचा त्यांचा हा दृष्टिकोन. वैयक्तिक प्रश्न, सामाजिक प्रश्नांपुढे त्यांना क्षुल्लक वाटत आले आहेत त्यामुळे व्यक्तींचें खोल जीवनदर्शन त्यांच्या वाङ्मयांत कुठेच दिसत नाहीं.

इतकें असूनहि त्यांच्या कादंबऱ्यांचें आकर्षण होतें याबद्दल दुमत होण्याचें कारण नाही, पण हें आकर्षण टिकण्यास त्यांच्या कादंबरींतील गुणांपेक्षा त्यानंतर आलेले कठोर, असामाजिक आणि दुर्बोध वाङ्मय जास्त कारणीभूत आहे. खांडेकरांनीं मांडलेली कणव किंवा भावनाप्रधानता ही शरदबाबूंच्यासारख्या वाङमयापुढे कितीहि कलाहीन तऱ्हेनं मांडलेली असली तरी नंतर भरास आलेलं रुक्ष, व्यक्तिनिष्ठ वाङ्मय पाहतां अधिक ओलाव्याची होती. कणव नसलेल्या वाङ्मयाचा लोकांना कांही उपयोग नसतो.

सर्वसामान्य माणसाच्या भाषेंत खांडेकर सर्व मांडतात. त्यांचीं पात्रें संवादांत तशाच चुकतमाकत कोट्या करतात. आपले विचार नीट न मांडतां येणारा सर्वसाधारण माणूस जसा बोलेल तशींच तीं पात्रं तत्त्वज्ञान बोलतात. खालीं दोन नमुने मुद्दाम देत आहें—

" मनुष्याला मरणाचं भय कां वाटतं ? "
" जगण्यांत आनंद आहे म्हणून "
" गरिबांनासुद्धा हा आनंद मिळतो का ? "
" हो. "
" कसा ? "
" प्रेमानं "
" प्रेम कसं असतं ? "
" परमेश्वरासारखं "
" आणि परमेश्वर कसा असतो ? "
" परमेश्वर निर्दय आहे " इत्यादि.

किंवा—

" बायको कुठं आहे ? "
" इंग्लंडांत "
" येणार केव्हां ? "
" पाहूं या ! तुम्ही आणाल तेव्हाच येणार. "
" जाऊन किती दिवस झाले ? "
" शंभर वर्षें होत आलीं. "
" म्हणजे ? "
" माझ्या बायकोचं नांव—नांव सांगूं—स्वतंत्रता "

या तऱ्हेचे ओबडधोबड व कांहीसे असंबद्ध संवाद खांडेकरांच्या वाङ्मयांत भरपूर विखुरलेले दिसतील. तरी त्यांतील ध्येयवाद, प्रामाणिकपणा, त्यागाची वृत्ति यांनीच वाचकाला मोहवलें यांत शंका नाही.

पण दुसरें महायुद्ध सुरू होतांच खांडेकरांचा प्रभाव कमी झाला. महायुद्ध व त्यानंतरच्या घटनांत आपल्या माणुसकीसारख्या कल्पना त्यांनाच स्वतःला भोळ्याभाबड्या वाटूं लागल्या का ? त्यानंतर महत्त्वाचं असं ते कांहीच लिहूं शकले नाहीत. मला नेहमी असं वाटतं की, जी कांही समाजाची मनःस्थिति पुढे बदलली तिचें आकलनच त्यांना झालें नाही. त्यांचा मध्यमवर्गीय भावनाप्रधान वाचक नाहीसा झाला. समाज वरपासून खालपर्यंत ढवळला गेला. रूपें बदललीं, वृत्ती बदलल्या. काळाबाजार, लाचलुचपत, अणुबाँब, थिल्लर आवडींची वाढ— भडक वाङ्मयाचा खप— नीतिहीनता या सर्वांचा अर्थ लावण्याचा त्यांनी अधूनमधून प्रयत्न केला. पण कलेच्या पातळीवरून हे प्रश्न त्यांना कधी घेतां आले नाहीत. कलेंत कालाचा प्रत्यय आणायला काल पचवावा लागतो हें खांडेकरांना साधलें नाही.

" ययाति " हा खांडेकरांचा मनाच्या गोंधळांतून बाहेर पडण्याचा ताजा प्रयत्न. खरें पाहातां ही कादंबरी वरीचशी निबंधच आहे. आपल्या निष्ठा-श्रद्धा–विचार–तत्त्वं खांडेकरांनी यांत इतकीं विवरण करून सांगितलीं आहेत की, पात्रांना त्यांत कांही वावच राहिलेला वाटत नाही.

म्हणून " ययाति " कादंबरी खांडेकरांची लेखनप्रवृत्ति मान्य केली

# मला दिसलेले लेखक

## ३

—मी

की, अत्यंत यशस्वी ठरेल. पण कलाकृति म्हणून मात्र त्यांच्यापूर्वीच्या कादंबऱ्यांच्या आसपासच ती येईल. एका विशिष्ट वृत्तीच्या वाचकांना ती मोहहि घालील, पण एक गोष्ट निश्चित की त्यांच्या साहित्यानं पूर्वीच्या सबंध पिढीला दिलेला दिलासा आजच्या किंवा पुढच्या पिढीला मिळणार नाही. कालानं त्यांच्यांतील जादू हरपवली आहे.

परंतु खांडेकरांच्या कादंबरीवाङ्मयांत निबंधवजा लिखाणाचा जो दोष जाणवतो—तोच त्यांच्या निबंधवाङ्मयाचा आणि टीकावाङ्मयाचा सर्वोत्कृष्ट गुण आहे. श्री. खांडेकर यांनी चिकित्सक टीकेने अलंकृत केलेलें वाङ्मय विपुल आहे. गडकरी, केशवसुत यांच्या वाङ्मयाचें त्यांनी केलेलें रसग्रहण पाहातां, आपल्या मागील पिढीच्या लेखकांची आणि समकालीनांची टीकावाङ्मयाने दखल घेणारे श्री. खांडेकर हेच एक थोर साहित्यिक आपल्यापुढे येतात.

•••


भारतीय शेतीच्या आर्थिक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील पहिलें पुस्तक

★ भारतीय शेती ★

स. ह. देशपांडे

पृ. १५५ + १० किंमत – २ रु. ६० न. पैसे

प्रकाशन :—

समाज प्रबोधन संस्था

१२४२ सदाशिव पेठ, पुणे २.

लोकराज्याचें स्वप्न साकार झालें
१ मे १९६२ पासून महाराष्ट्रांत सर्वत्र

# पंचायत राज्य



# भारजी............ललित ठोंबरे



भारजी ही धडपड कामाची नाही. ह्या तुरीच्या ओळींतील एकांतांत तुला कोणीच सोडवणार नाही. हा हाताचा विळखा लालजीचा आहे........

'तिकांड' दिसते काय ? म्हणून भारजी खाटल्यावरून उठते, अन् डोळे चोळत आभायाकडे पाहते. काळचाकुट्ट राती मधूनच चमकणाऱ्या काजव्याच्या प्रकाशाखेरीज तिला कांही दिसत नाही. 'रात लई आहे' म्हणून तशीच माघारी येत खाटल्यावर पहुडते. टपराच्या कवाडांतून वाहणारा थंड वारा हिवाळ्याची चुणूक अधिकच दाखवितो. थंडीने भारजी अधिक हुडहुडते व चंद्र्याला जवळ घेऊन गोधडी अंगाशी लपेटते.

भारजीला झोप येत नाही. चंद्र्याच्या पाठीवरून हात फिरवत, गोधडीच्या उबेने विचाराधीन होऊन डोळे मिटते. 'चंद्र्याच्या वडिलास जग सोडून गेल्याला येत्या पुसास पुरं साल होईल...तिला सारं सारं आठवलं. तिचा गणबा ! लाडक्या चंद्र्याचा 'बाबा' अशाच दिसांत, अशाच भल्या राती रक्तबंबाळ होऊन आला होता. म्हणत होता,

"भारजे, लोक लई खराब आहे... चंद्र्याला संभाळ. लालजी तुपं समाधान माया रक्तानं झालं ना ? होऊं दे पण धन्याची चाकरी मीं बजावली. कापुस तुले नेऊं दिला नाही. माह्या धन्या, चंद्र्या...भारजे...चाललो संभाळा"...वाऱ्याची झुळक आली व दिवा विझवून गेली.

तोच प्रसंग भारजीच्या डोळ्यासमोर तरळत होता. लालजीच्या सांगण्याप्रमाणे चोरी करून कापूस लालजीच्या घरांत पडला नाही. म्हणून ही अमानुष हत्या घडला होती. भारजीच्या व्यथित हृदयाला तें बोचत होतं. टोचत होतं...पण ?

कु ऽ कु च कु ऽ म्हणून खुराडांतून कोंबड आरवतो. भारजी तशीच खडबडून उठते. 'काय गाय ! कामाच्या दगद्यानं चेयच येत नाही' म्हणतच जात्याच्या खुंट्याला धरून विचारमालिकेचा झिम्मा चालतो. दोन-दोन ज्वारीच्या दाण्यासमवेत जीवनांतील दुःख जात्याच्या घरघरणाऱ्या आवाजांत विसरते.

"मा वो ! मले मुताले लागली ना वो !" या चंद्रयाच्या शब्दाने जात्याची घरघर थांबते. भारजी त्याला उचलून अंगणांत नेते. हाता-वर पाणी घेऊन चंद्रयाच्या चिपडच्या डोळ्यां-वर भारजीचा पदर फिरतो.

"राहूं दे न ओ ! मी भाकल खातों" म्हणत चंद्रया आईपासून दूर सरतो.

हो माया राजा ! आता तू देतो गरम गरम भाकर ! भारजी आभायाकडे पाहते. तो कासरा दोन कासरे दिवस वर आलेला दिसतो. भारजीची गडबड धांदल चालू होते. पाणभदाडांतील मडकें उचलून झपझप नदीच्या घाटावर येते. तिच्याच बरोबर तिच्या वयाच्या भीमीच्या कपाळावरील कुंकू पाहून पाण्याने भरणाऱ्या मडक्याच्या बुडबुड्यावरो-बर डोळ्यांतील आसवं पाण्याच्या वलयांत पडतात व पाणी म्हणून एकरूप होतात.

भारजीचं हें असंच चाललेलं आहे. लग्नाच्या बोहल्यावर बसली. संसाराचा डाव मांडला अन् तो लवकरच उघळला. २१ वर्षांची भारजा. वर्णानं सावळी ! नाकाडोळ्यानं रेखीव ! ! दारिद्र्याच्या आचेनें व वैध-व्याच्या तडाख्याने पछाडल्यामुळे चेहरा जरा मलूल. पण पवित्र्याच्या तेजाने व लाडक्या लेकाला शिकून सवरून "सायबावाणी" कर-ण्याच्या इर्षेने तो तेवढाच करारी वाटतो.

भारजी, पाण्याच मडकं पाणभदाडांत ठेवते नि खोपटांत शिरते.

"मा वो ! मले भूक लागली ना ओ !" चंद्रया एकच आकांत करतो.

"हो माया राजा! आताच देतो गरम गरम भाकर" म्हणतच भारजी चूल पेटवते. गोव-रीच्या खांडावरोबर मुठभर तुराठयाने विस्तव प्रज्वलित होतो. विस्तवाच्या उजेडांत भारजी अधिकच तेजस्वी दिसते. शेकाने कपाळावरून घामाचे थेंब थबकतात. ते शेवाच्या पदरानं पुसल्यावर ओल्या झालेल्या पदराला कुंकवाचा थोडाहि डाग नाही याची खंत वाटते. पण शेजारीच बसलेल्या चंद्रयाच्या फुरफुरणाऱ्या नाकाचा शेंबूड पुसताच वैधव्याचें दुःख विस-रते अन् चंदरमानासाठीच हें जीवन असा दीर्घ सुस्कारा सोडते !

●●●

फक्कड मिशा ! ढंगदार चपला नि त्याला साजेसा नेहरु सदरा व पांढरी टोपी घालून येणाऱ्या लालजीकडे बघावं आणि ज्यान त्यान आपलं कल्याण करावं ! लालजी ! लालच आहे गांवचा. आखे लोक भजतात लालजीला. लालजी बिना गांवच निभते काय म्हणावं ?

पैंकू मांगापासून दामोधरपंतापर्यंत प्रत्ये-कालाच लालजीची गुरज आहे. ग्रामपंचा-तीचा कारभार, गांवाची सुधारणा, भांड-णाचा न्याय ह्या गोष्टी लालजीशिवाय निभा-यच्या नाहीत विधवांचा व अनाथांचा तर तो वालीच आहे ! न्याहारीच्या वखतापासून तर मांजर झाकीपर्यंत बायांची व गडीमाणसांची धमाल गर्दी पाहिली म्हणजे त्याची प्रचिती येते. लालजी लालच आहे कृत्यांनी !

चपलांचा कर्रऽ कर्रऽ आवाज करत व मिशीवरून हात फिरवत लालजी शेजारच्या आखरांतून वावरांत निघतो. वावरामागं वावरं टाकीत मालकीच्या वावरांतील वरळी-वर उभा राहतो. हिरव्या कच पन्हाटीकडे व तिच्या टपोऱ्या बोंडांतून लोंबकाळणाऱ्या काप-साकडे पाहत लालजी प्रफुल्लीत होतो आणि मग समाधानांत ज्वारीच्या शेतांत पाऊल टाकतो. मळ्यावरील दिसणाऱ्या भूजाडण्याकडे व एकवेळ स्वतःच्या अंतरस्थी मनांत डोकावून मळ्याची एक एक पाऊटणी चढत व सोका-न्याला शिव्या हासडीत मळ्यावर बसतो. झुपकेदार कणसांतील मोत्यांच्या दाण्यावर पाखरांची चाललेली किलबिल पाहून स्वारी खूष होते.

मग हळूच मध्यावरून सभोवताल नजर भिरभिरते. सगळी शेतं हिरवी दिसतात. धुऱ्यावरील बोरी–बाभळीच्या काट्या त्याहि काट्यांना झांकून हिरव्याच दिसतात. एव-ढ्यांत पाखरांचा थवा भुर्ऽकन उडतो. धांड्याची सय सय होते, अन् क्षणांतच थांबते. लालजीचे डोळे वावरांतून जाणाऱ्या सरडा-कडे लागते. अरेच्चा कोण ?

हूँऽहूँऽहूँ. गणवा ? हां !

●●●

"लई वखत झाला. दोन तीन धडे तरी कापूस झाला पाहिजे बाई !" म्हणत चंद्रयाच्या गालाचा एक मुका घेऊन सर्व बाया निघून गेल्यामुळे भारजी झप झप पावलं टाकीत जाते.

धुऱ्यावरील काटीवरचा लालतोंड्या सरडा धपकन उडी टाकतो, धांड्याचा आवाज होतो. तशी भारजी केवढ्याने दचकते. पण तो सरड्याचा आवाज आहे हें पाहून स्वतः-लाच खुळी ठरवते. खांद्यावरचा ढळला पदर बरोबर करून भर भर पावलं उचलीत, शेता-मागून शेत ओलांडत, काट सावरीच शेत-जवळ आहे या समाधानाने उगीचच कमरीची पिशवी काढून सुपारीच खांड व तंबाखूची भुंकटी चघळते.

"कोण ? भारजी व्हय काय ? कुठं चालली एकटी ?"

"जी धनि, ... मी व्ह का ! कापसाले."

"बरं वरं जरा थांबशील की नाही ! थांव."

"वखत लय झाला ना जी ? समद्या बाया गेल्या."

"ठाव आहे मला ते. पण...भारजी...ह्या लालजीच्या डोळ्यांत तुला कांहीच दिसत नाही. हो, तुया पोराचा नांव काय, चंद्रभानच ना ! काय लेक एवढी काळजी ! दोन-मायलेकं तर सहज पोट भरूं शकता आपल्या पायीवर राहून."

मस्त डोळे भारजीकडे रोखत लालजी भारजी जवळ येतो....

"धनि काय बोलण हें...लई वखत झाला नका अडवूं माझी वाट."

"हॉं हॉं हा मी तुझी वाट अडवतो, खुळी ! ये अशी जवळ ये !"

भेसूर हास्याने भारजी अधिकच दचकते तिला प्रसंग कांही चांगला वाटत नाही देवा! तूच आता सांभाळ. ! !

"भारजे, काय विचार करते. वा ! वा ! ! गालावरचा तीळ छान दिसतो. वा ! छान!"

भारजीचे अंग शहारलें. डोळे वटारले. ती चंडिका बनली. पण क्षणिकच ? कारण... अबला ...विधवा होती ती ! !

भारजी ही धडपड कामाची नाही. ह्या तुरीच्या ओळींतील एकांतात तुला कोणीच सोडणार नाही. हा हाताचा विळखा लालजीचा आहे. तो अधिकच घट्ट होईल...

झाडावरील टिटवीने टिटीव टचू केलें. पण सोकाऱ्याच्या एकाच गोफणीच्या दग-डाने तिला पछाडले.

●●●

रात्र दर एक क्षणाने चढत आहे. काळोख पसरला आहे. सारे लोक दिवस भऱ्याच्या दगद्याने झोपेच्या आधीन झाले आहेत. पण एका खोपड्यांत एक मंद ज्योति तेवत आहे. डोक्यावरील केस सताड मोकळे सोडून एक बया साश्रू नयनाने जवळच्या चिमण्याराजाच्या तोंडावरून हात फिरवत आहे. अनेक वेळा हात फिरवूनहि अतृप्त मनाने खोपाटाचें दार बंद करून बाहेर पडली आहे.

काळचाकुट्ट "आभाळांत" एखादी चांदणी उगीचच चमकते. एवढ्या राती सोकाऱ्याची आरोळी व आखरातींल कोल्ह्यांची कोल्हेकुई रात्रीची भीषणता वाढविते.

अशा वेळीं नदीचा शांत प्रवाह काळाकुट्ट रात्तीसारखा चालू आहे. पण...घाटावरून पाण्यांत भडकन् कांही तरी पडल्याने पाण्याने उसळी मारून रात्रीची भयानकता अधिकच तीव्र केली. घाटावरील गोटे व शेवाळ या पलिकडे तो आवाज कोणालाच ठाव नाही. फक्त ठाव आहे. भयाण राती झाडावर बसून घुत्कार करणाऱ्या घुबडाला.

●●●

सूर्य नारायण वर आला आहे. घाटावर बाया बापड्यांची एकच गर्दी उसळली आहे. कोणाचें प्रेत ! बापरे ही तर भारजा ! भारजीने असें कां केलें असावे म्हणून चौकस दृष्टीने लालजी सर्व जमावास विचारत आहे. सारा आकांत माजला आहे. अन् ह्या आकांतात शिकून सवरून 'सायबावाणी' मोठा होणारा चंदरभान प्रेताला कवटाळून लोकाकडे डोळ्यांतील आसवं गाळत गाळत पाहत आहे.

त्याची माय व त्याचा बाबा ! दोन्ही त्यास आशिर्वाद देऊन खुळ्या जगास व लालजीस हसत आहेत.

●●●



# स्पर्श

स्पर्शाचें तें लाल पाखरूं
खांद्यावरती माझ्या बसतें
खांदा तेव्हा खांदा नुरतो
विशाल फांदी त्याची होते

फांदीवरूनी अंग झाडुनी
घरट्याच्या तें उबेत शिरतें
गुंफुनि अेकामधुनी एक
बोटांचें मऊ पीस बनवितें

तिथुनी उटतें दूर उडाया
डोळ्यामधुनी पल्याड जातें
जातां जातां मिटतां डोळे
त्यांतच झिंगुनि अडकुन पडतें

स्पर्शाचें मग हळू पाखरूं
मनांत माझ्या वाट शोधते
वेडे मनहि बनुनि पाखरूं
तुझ्या मनगटीं उतरून बसतें

—रमेश ललगूणकर




“ हें अथांग निळं आकाश, ही हिरवीगार धरणीमाता, हें शुद्ध पवित्र जल, हें जीवनदायी ग्रह-तार्‍यांचं तेज आणि अविश्रांत वाहणारा पवन—या पंचमहाभूतांच्या अखंड नि प्रेमळ आशीर्वादाने जगणारे आम्ही पृथ्वीवरचे आनंदयात्री आहोंत !! ”

प्रिय वाचक ! जीवन हा आनंदाचा शोध आहे. सुखासाठी चाललेली ती एक धडपड नव्हे. पहा, आपल्याला या आनंदयात्रेचा अनुभव घेतां येतो कां ?



# आनंद यात्री

सुधाकर जोशी

पूर्वेकडल्या क्षितिजावर लक्ष लक्ष सुवर्ण किरणांच्या रथातून भास्कर प्रकट झाला होता. पिवळं पिवळं धमक उन्ह टेकडीवर सांडलं होतं आणि त्या कोवळ्या उन्हाने सगळ्या टेकड्या उजळून निघाल्या होत्या. झाडांवरून, शेतांतून, कुरणांतून उन्ह ओघळलं होतं, पसरून विखरून राहिलं होतं ! पलिकडला आंबा मोहराने फुलारून आला होता. पानाजवळ, डेखा-डेखाजवळ आंब्याच्या नाजुक पिवळया पुष्पांनी मोहक गर्दी केली होती. अन् कोवळ्या केशरी उन्हाने त्यांच्या सौंदर्यांत भर घातली होती. आंब्याच्या जीवनरसावर जगणार्‍या वांडगुळांच्या वेलीचे ताणे खाली वाकडे तिकडे लोंबले होते. तरी त्याच्या वाकात, त्या वाकडे तिकडेपणांत देखील एक सौंदर्याची झांक होती. त्याची पिवळट, हिरवट, लालसर आणि निळसर पानं उन्हांतून न्हाऊन भिजून गेली होती. केशरी रंगाने सजूं लागली होती. इतक्यांत एक पोपटी पारव्या रंगाचा चिमुकला पक्षी आला आणि वेलीच्या ताण्यावर बसून त्याने एकदम झोके घ्यायला सुरुवात केली. एवढासाच जीव, पण किती आनंदांत होता ! उत्साहाने, मस्तपणें झोके घेत होता. कुठल्या एवढ्या आगळ्या आनंदाचं, हर्षाचं, उन्मादाचं, बेहोषाचं तें प्रतीक होतं कुणास ठाऊक ! एकीकडे वेलीचा हिंदोळा करून तो झोके घेत होता आणि एकीकडे चोच उघडून एक अनाकलनीय पण सुमधुर असं गीत गात होता !

तें गाणं ऐकून का कुणास ठाऊक मला वाटूं लागलं की, मनांत कसलीतरी अननुभुत हालचाल होते आहे. कांहीतरी जागत आहे; कांहीतरी उजळत आहे; कुठेतरी उजाडत आहे. वार्‍याच्या लहानशाच झुळुकेबरोबर एकदाच फक्त अतिमधुर असा सुगंध यावा आणि त्याने क्षणभरच मन रंगून जावं, वृत्ती फुलारून याव्यांत, चैतन्याची एक अगदी नाजुक, पण सबंध शरीराला रोमांचित करणारी उर्मी लहरून जावी तशी त्या पक्षाच्या गाण्याने माझी अवस्था झाली, पक्ष्याच्या त्या गीताने आणि मोहराच्या त्या गंधाने मी मुग्ध झालों, इतक्यांत हृदयाच्या गाभ्यांतून कुणीतरी ओरडलं “ हें खोटं आहे, मायावी, फसवं आहे; सत्य फक्त एकच आहे आणि ते म्हणजे ब्रह्म ! ” आणि मग काशीला झालेल्या वेदान्त विषयावर परिसंवादांतली ती जीवघेणी वाक्यं चिडून तडफडून कोसळणार्‍या पावसाच्या थेंबाप्रमाणे माझ्या कानावर आदळूं लागली !

तीन दिवसांच्या त्या परिसंवादांत अनेक पंडितांनी मत-प्रदर्शन करून तो विषय अगदी सर्वांगांनी फुलविला होता. सगळा मांडव एका अननभूत विचारदर्शनाने रोमांचित झाला होता ! निराकार परब्रह्माच्या दर्शनाच्या कल्पनेने सगळ्यांच्या चेहर्‍यावर एक प्रकारचा अवर्णनीय आनंद झळकत होता ! आणि ह्यांत निराळा होतो मी. मला कांही कळत नव्हतं, उमजत नव्हतं ! पण उगाचंच विचित्र अट्टाहासाने काकांच्या मागे लागून मी इथे प्रवेश मिळवून आलों होतो आणि अर्ध्या रणांगणांतून पळून जाण्याइतकी भीरुता किंवा धडाडीहि मजजवळ नव्हती. म्हणूनच मनाचा असह्य कोंडमारा सहन करीत मी बसलों होतो. सगळे ब्रह्मनंदांत तल्लीन होते आणि मी मात्र अंधारांत चाचपडत होतो. अखेर तीन दिवस संपले. काकांना नाशिकला सोडून मी गांवी परतलो, पण पाण्यांत वाकडं तिकडं पडल्यावर एकदमच छातीवर दडपण यावं आणि मग पाण्याच्या बाहेर आलं तरी तें तितकंच जाणवत राहावं तसंच झालं होतं अगदी ! आध्यात्मिक विचारांचं ओझं एवढंसुद्धा कमी होत नव्हतं. सगळ्या गोष्टींकडे पाहाण्याची दृष्टीहि अगदी मृतवत झाली होती. आणि तो तर माझा स्वभाव नव्हता. मला जीवनाची, सौंदर्याची, इहलौकिक सुखांची अभिलाषा होती आणि म्हणूनच माझ्या स्वैरवृत्तीच्या मनाला गुदमरल्यासारखं झालं होतं !

आज सुद्धा कांही सुचत नव्हत. म्हणून अभ्यासिकेंतून उठून मी इथं ओटीवर येऊन बसलो होतो, समोर फुलणाऱ्या आनंद, गंध आणि नाद उधळणाऱ्या निसर्गात मन रमविण्याचा प्रयत्न करीत होतो. पण इथेहि ती वाक्यं माझी पाठ सोडायला तयार नव्हती. एखाद्या पछाडणाऱ्या समंधासारखी ती माझा अवरित पाठलाग करीत होती. आणि मी पुन्हा एकदा जगांत इथे ओटीवर असून नसल्यासारखा, जाणवून न जाणवल्या सारखा, बघून न बघितल्यासारखा निर्भावित होऊन बसलों होतों. बाहेरच्या त्या हंसणाऱ्या–बागडणाऱ्या निसर्गाकडे निर्जीव, अहेतुक दृष्टीने पहात होतों. पुन्हा एकदा मनाच्या चंद्रावर काळचाकुट्ट विचार मेघांचं आवरण आलं होतं. पण इतक्यांत दोन तीन चिमण्या गोड चिवचिवाट करून खाली उतरल्या. ओटीवर सांडलेल्या तांदुळाचे दाणे टिपून घेण्याकरिता गडबड करूं लागल्या. मला संवेदना आली, त्या जिवंत आवाजाने मला भान आलं. मी कुठे बसलों आहे, काय करतों आहे ह्याची जाणीव होऊं लागली. आणि खुर्चीतल्या खुर्चीत मी पुन्हा जगांत आलों, अव्यक्तांतून व्यक्तांत; अज्ञानांतून ज्ञानांत आलों. ब्रह्मांतून मायेजवळ आलों ! ! इतक्यांत छोटी प्रियवंदा उत्साहाने कुठलीतरी गोड बातमी आणल्यासारखी धावत माझ्याजवळ आली आणि माझा हात ओढीत म्हणाली " बाबा, आधी बाहेर चला, तुम्हाला किनई एक जम्मत दाखवायचीय् "

" कसली गंमत आहे प्रियम् ? सांग इथंच "

" अं ऽऽ इथं नाही हं ! बाहेर चला अगोदर "

" अग पण काय आहे एवढं ? "

" किनई. आपल्या लिलीच्या झाडाला एक छान छान फूल आलंय् ! "

" मग तूंच आण तोडून तें इकडे मला दाखवायला "

" वा ! वा ! पहिलं फूल तोडायचं असतं का कधी ? चला ना बाबा, असं काय करता ? " माझ्या शर्टाची बाही ओढीत तिने मला जवळ जवळ उठवलंच.

" बरं चला. दाखवा कुठाय् तुमचं तें फूल " एकदम त्या गहन विचारांतून मोकळा होत, तिच्या बालीश भावनाशी समरस होत मी म्हणालों आणि तिच्या मागे चालू लागलों.

आम्ही परसदारीं आलों. तिथं एका तांबड्यालाल कुंडीत हिरव्यागार लिलीची पाती



जीवनाचा अमोल चिरनूतन संदेश देत फुलारून वर आली होती. आणि चैतन्याचा अद्वितीय ठेवा असलेलं तें एक सुंदर फूल त्यावर हंसत डोलत होतं. अथांग निळ्या आकाशांत रुपेरी चंद्रमा शोभून दिसावा तसं ते लिलीचं फूल भासत होतं. कुठला तरी अनिर्वच संदेश देत वाऱ्याच्या झुळुकेबरोबर नाचत होतं, आनंदाने हंसत होतं आणि कुठलं तरी अनाकलनीय, असं गीत सुद्धा गात होतं. जगाच्या सौंदर्याचं, मायेच्या अविष्काराचं ब्रह्माच्या हास्याचं अस्फूट गीत ! वास्तविक तें फूल कांही मी पहिल्यांदाच पहात नव्हतों, पण ते लिलीचं फूल निराळंच कांही तरी सांगत होतं. चटकन् उमग न पडणारं, भराभर आकलन न होणारं ! जीवनाच्या सत्यतेचं, अदम्य उत्साहाचं, आयुष्यांतल्या निगूढ आनंदाचं मौलीक तत्वज्ञान [जणू तें आपल्या मंगल स्मितानं साऱ्या जगाला सांगत होतं. मी मनांत अशीच विचार पुष्पं फुलवीत, नव्हें, आपोआप फुलणाऱ्या त्या पुष्पांकडे पहात स्तब्ध उभा राहिलों. माझ्या ह्या निस्तब्धतेचा बोध न होऊन प्रियंवदा मध्येच म्हणाली, " कित्ती कित्ती छान आहे नाही, आणि हें रंगीत बारीक कणमुद्धा कित्ती छान दिसताहेत नाही ! काय म्हणतात हो बाबा त्यांना ? "

" त्यांना पराग म्हणतात प्रियम, आपल्याला फुलाचा वास येतो ना तो यांच्यामुळेच ! "

" अय्या खरंच ! बघूंया तरी " म्हणून मग ती अगदी खाली वाकून त्याचा वास घेऊं लागली. तिची ती थिटुकली, नितळ व कोवळ्या कातडीची गोरीपान मूर्ति; अंगांत निळ्या पिवळ्या रंगाचा झगा ; तिच्या आईने ऐटीत डोक्यावर बांधलेलं तें रिबीनीचं फूल ; कुठे सौंदर्याला उणीव नव्हती. इतक्यांत पलीकडे फस्स ऽऽ असा आवाज झाला. मी मागे बघितलं. प्रतिभेने बादलीतलं पाणी केळीखाली फेकलं होतं आणि त्या व्यायलेल्या केळीकडे वात्सल्याच्या, मायेच्या नजरेने पहात कुठल्यातरी विचारांत गढून जाऊन हातवारे करीत होती ती. एकाएकी तिचं लक्ष माझ्याकडे गेलं आणि मी तिच्याकडेच बघतों]आहे हें लक्षांत येऊन लाजून जाऊन ती म्हणाली,

" इश्श! माझ्याकडे काय बघताय् असं ! "

" तूं केळीची किती काळजी घेते आहेस ते पहातोय् मी "

" तर तर, तुम्ही अजीकडे लक्षच देईनासे झाला आहात मग काय करणार ! व्यायलीय् ती केळ. बाळंतीणीसारखी तिची काळजी घ्यायला हवी. बरं म्हटलं तर आता तिच्या तळाशी आळं करायला हवं आहे, भर घालायला हवी आहे. मला कांही तें जमणार नाही म्हणून पाणी घालण्याचं, माझ्या हातचं काम तेवढं मी करते आहे. तुम्ही तर आता अगदीच लक्ष देईनासे झाला आहात. काशी झाली; आतां कुठं जायचं आणखीन ? "

" ...नाही नाही, आता कुठंसुद्धा नाही; अगदी तूं सांगशील तसं वागणार. संपूर्ण पत्नीवचनांत राहायचं. म्हणजे इकडं लक्ष नाही तिकडं नाही असा आरोप नको यायला. बोला, काय आज्ञा आहे ? "

" केळीला भर घालायला हवी आहे. तें

गुलाब खूपच वाढलेत, छाटायला हवे आहेत ..."

"...अंऽऽ अंऽअं कृपा करुन आजचा दिवस तरी कांही कापाकापीचं सांगूं नकोस. आणखीन् काय व्हायला हवं आहे तातडीनं ?"

" इतकी अगदी लहरच आली आहे तर तें केळीचं आळं पुरं झालं तरी खूप झालं. "

" ठीक आहे. प्रियम्, जा कुदळ फावडं घेऊ ये "

" आणते, पण मलासुद्धा दिले पाहिजे हं थोडसं खणायला "

" देईन देईन. आता बाप आणि लेक दोघहि कामाला लागूया. मात्र आई नको बरं का ! तिला कांही तें जमायचं नाही. "

" तर तर एवढा अगदी गांवाला डंका पिटवणं चाललंय् तर बघूंया तरी काय काय पुरं होतं आहे तें " म्हणत ती प्रियमच्या पाठीमागे घरांत गेली. प्रियमनं मग कुदळ फावडं आणलं. मी भरभर कामाला लागलों. फावड्यानं अनावश्यक माती बाजूला केली आणि खाली आळं तयार केलं. आता पलीकडून थोडी माती आणून टाकली की, माझं काम पुरं होणार होतं खूप काम केल्यासारखा मग मी कमरेवर हात ठेऊन उभा राहिलों, इकडं तिकडं पाहूं लागलों.

उन्ह आणखी वर चढलं होतं. केळीच्या हिरव्या पोपटी पानावरून लोंबलेल्या घडावरून बागेतल्या प्रत्येक पानांफुलांवरून सोनेरी रसाचा वर्षाव चालला होता. पलीकडे तारेच्या कुंपणाजवळ लाल, पिवळ्या, केशरी रंगाचे झेंडू अमाप फुलले हाते, त्यांचे गुच्छच्या गुच्छ नजरेंत भरत होते. उन्हांत चमकणाऱ्या त्यांच्या पाकळ्या मनांत एक आगळी संवेदना निर्माण करीत होत्या. दोन-तीन फुलपाखरं अगदी स्वैरपणें उडत होती, मस्तपणें मकरंद पीत होतीं-कधी पंख उघडे ठेऊन कधी बंद करून !! आणि प्रियवंदा खणण्याचं वेड विसरून त्याच्यामागे धावत होती. सगळं आकाश निळंभोरं होतं आणि उन्हानं तळपत होतं. वसंतागमनामुळं शृंगारलेलीं झाडं त्याच्या पार्श्वभूमीवर शोभून दिसत होती. दोन-तीन काळेभोर भुंगे उनाडपणें इकडे तिकडे बागडत होते. फुलांफुलांतून मधुपान करीत गुऽऽगूंऽऽऽ असा कर्णमधुर गुंजारव करीत होते. मी त्या सौंदर्य-समाधींत आणखी किती गुंगलों असतों कुणास ठाऊक! पण इतक्यांत प्रतिमा घरंतून आली आणि म्हणाली, "एवढं सरबत घ्या आणि तेवढी भर घालून अंघोळ करून घ्या. जेवण तयार होतं आहे. रविवार असला म्हणून उगाचच किती उशीर करायचा, जेवायला ! "

" बरं बरं आण पाहूं ! इतकी तयार बायको असल्यावर मी समोरची ती टेकडीसुद्धा एकटा फोडूं शकेन "

" तर तर, हरभऱ्याचं बी पेरणार आहात की काय ह्या खणलेल्या जागीं?" असे म्हणत तिने सरबताचा पेला माझ्या हातांत दिला पण तिच्या हातांतून तो घेतांना तिच्या हाताचा मुलायम स्पर्श माझ्या हाताला झाला आणि एक अनामिक शिरशिरी माझ्या नसानसांतून धावून गेली, काया रोमांचित करीत गेली ! तसं पाहिलं तर प्रतिभेचा स्पर्श कांही मला नवा नव्हता. आज पांच वर्षांत तो अगणित वेळां झालेला होता. मग असं कां व्हावं ? ही कसली किमया ? विचारांना जास्त धोंघावूं न देतां मी मुकाट्यानं सरबत प्यायला सुरवात केली. सरबताचा पेला पुन्हा प्रतिभेकडे देत मीं प्रियमला म्हटलं " चला प्रियम माती खणायला. मी भरून देईन, तूं थोडी थोडी इथे आणून टाक हं ! "

" मी घरांतली बारकी बादलीच आणूं कां ? " म्हणत ती घरांत गेली. मी खणूं लागलों. इतक्यांत बादली घेऊन येत असलेली प्रियम एकदम हातांतली बादली खाली टाकीत किंचाळली. " आईऽऽग ऽऽ " मी कुदळ खाली टाकली आणि तिच्याजवळ गेलों. इतक्यांत तिचं ओरडणं ऐकून प्रतिमा अंगणांत आली. बादलीच्या सुटलेल्या पत्र्याने तिचा हात कापला होता. मी प्रतिभाला म्हटलं " हात कापलाय् तिचा. आयोडीन घेऊन ये लवकर " आणि भळभळ रक्त वाहवाणारा तिचा अंगठा मी बोटांनी दाबून धरला. प्रियमचा उतरलेला रडवा चेहेरा पाहून माझं हृदय कळवळलं. तिचं दुःख माझ्या हृदयाशी पोहोचलं, तिचा कापलेला हात, तिचं रक्त पाहून माझं मन व्यथित झालं. स्वतःच्या शरीरावर कुठलीहि जखम झालेली नसतांना तिला होणाऱ्या वेदना मला जशाच्या तशाच कां जाणवाव्यांत हा कुठला संबंध ? हे अंतरीचे धागे इतके कसे नाजूक ? हा कुठल्या मायेचा परिणाम ?

" बघूं कुठे कापलाय् बोट ते ?" प्रतिभाने पुन्हा एकदा माझी समाधी मोडली. "आणलं का आयोडीन ? हं लाव इथे. " एकदम भानावर येत मी प्रतिभाने आयोडीन लावल्यांवर मी त्यावर पट्टी बांधली अन् म्हटलं, " हें बघ प्रियम तूं आता तिथे दगडावर बसून रहा आणि मी कसं काम करतो तेवढं पहा. वाटलंच तर तूं तुझ्या पुस्तकांतल्या कविता म्हण एकीकडे, हं, शहाणी आमची प्रिया ! "


स्था. ३१-१२-१९५७ ] जय सहकार [ र. नं. p.४४५१

शुद्ध शेंगदाणा तेल व सकस बैलघाणी पेण्डीचें उत्पादन करणारी...

**वडगांव ग्रामोद्योग तेल**

• उत्पादक सहकारी सोसायटी लि. •

* पेठ वडगांव, जि. कोल्हापूर *

—सेक्रेटरी— महालिंग शिवरुद्र गाताडे | —चेअरमन— बजरंग अनंत सावर्डेकर

★ १ किलो तेलास ५ न. पै. रिबेटची सवलत ★



आपल्या इंजिन्ससाठी उत्कृष्ट दर्जाचे लायनर्स व पिस्टन्स तयार करणारे कोल्हापुरांतील एकमेव कारखानदार...

**श्री दूत इंजिनियरिंग कार्पोरेशन**

• लायनर्स व पिस्टन्सचे उत्पादक •

६४, शिवाजी उद्यमनगर,

कोल्हापूर

मग घरांत जाऊन तिने तिचं पुस्तक आणलं आणि एका दगडावर बसून ती हळू हळू कविता म्हणूं लागली. गोड, कोमल आवाजांत! आणि त्या तालावर मी खणूं लागलों. मातीची ढेकळं वर येऊं लागली. कुदळ तिरपी करून तिच्या दांड्याने मी तीं तिथेच फोडूं लागलों आणि असं खणतां खणतां, फोडतां फोडतां विचार येत होते......

"आंब्याच्या झाडावरची ती नाजूक सोनेरी रंगाची इवली इवली फुलं, बांडगुळाच्या वेलीची निळी-पोपटी कोवळीं पानं, धुंद बेहोष होऊन गाणारा तो पक्षी, तें हिरव्याकंच पातीवर विलसणारं लिलीचं फूल, चैतन्याचा गाभा असलेलें रसरशीत केळीचे घड, सुंदर विलोभनीय नारींगी केशरी रंगांची असंख्य गेंदेदार झेंडूची फुलं, नाचणारी बागडणारी रंगीबेरंगी फुलपाखरं आणि काळे कुळकुळीत तुकतुकित भुंगे! हें सारं दिसत असतांना खोटं कसं म्हणायचं? पण हें झालं दुरून जाणवणारं सौंदर्य. पण प्रियमला जखम झाली असतांना हृदयाला झालेल्या वेदना, प्रतिभेच्या स्पर्शानं केलेली किमया अनुभवास येणारं सारं मिथ्या कसं ठरवायचं?

नाही हें खोटं नाही, खरं आहे, अगदी खरं आहे. निदान आम्हा सामान्य माणसांच्या दृष्टीकोनांतून तरी तें निश्चित सत्य आहे, त्या जग मिथ्याच्या कल्पना आम्हा भोगवादी लोकासाठी नाहीत. आमचं ब्रह्म वेगळं आहे. त्या परमात्म्यासंबंधीच्या आमच्या कल्पना आहेत. आमचं ब्रह्म रूपांत, गुणांत सांठवलेलं आहे. आमचा ब्रह्म निसर्गांत भरला आहे. आम्ही त्याला कलाविष्कारांत, सौंदर्यानुभूतींत रूपसंशोधनांत आणि क्रीडा-विलासांत अनुभवीत आहोंत.


विचारांच्या वेगात मी जोरजोरात कुदळी मारीत होतों, एकाएकीच खण्ऽऽण्ऽऽ असा असा आवाज झाला. कुदळीचं पातं एका दगडावर आपटलं होतं. मी भानावर आलों. अबब! खूपच माती खणून झाली होती. आता फक्त घमेल्याने ती केळीं खालीं नेऊन टाकली की, माझं आळयाचं काम पुरं होणार होतं. मी पुन्हा भरभर कामाला लागलों. अन् थोड्याच वेळांत आळं तयार झालं. मी प्रतिभेला हाक मारून पाणी आणायला सांगितलं. ती पाणी घेऊन आली आणि आळं पाहून आनंदाने म्हणाली "किती सुंदर केलं आहेत आळं तुम्ही! मला कां इतकं चांगलं करतां आलं असतं. तुमच्या अंगात कौशल्य आहे पण आळशीपणा सुद्धा तितकाच आहे. कलेचं कौतुक करायचं की..."

"...बरं बरं आण इकडं बादली" असं म्हणत तिच्या हातांतली बादली घेऊन मीं मातीवर पाणी शिंपलं आणि ओ हो!! काय खमंग, सुंदर मृद्गंध आला! लगेच मनांत एक मधुर संभ्रम निर्माण झाला. प्रतिभेचं बोलणं गोड की, मातीचा सुवास गोड! निदान माझ्यापुरतं तरी ते न सुटणारं कोडं होतं आणि मग न्हाणीघराचं पाणी केळीला येण्यासाठीं वाट करून देत मीं स्वतःशीच म्हटलं, "अस्स! हां आता ठीक झालं. अहो बाईसाहेब, आता ही केळ आणि तुम्ही. हवा तो गोंधळ घाला, आमचं काम झालं. बराय् आता अंघोळीला पाणी काढून ठेवा. मी घरांतून अंगपुसणं घेऊन येतो" कपाळाचा घाम निपटीत मी म्हणालो आणि घरांत गेलो.

घरांत जाऊन मी पंचा आणला तो बाहेर प्रतिभाने विहीरीचं पाणी काढून ठेवलेलचं होतं. मी दगडावर बसून भडाभडा अंगावर पाणी ओतूं लागलीं अहाहा! काय तो थंड पाण्याचा स्पर्श! अंगमेहनतीचं काम केल्यामुळे तर तो अधिकच आल्हाददायक, रोमांचकारक वाटत होता. काय जादू भरली होती त्या शीतल स्पर्शांत कुणास ठाऊक! वाटत होतं की, असे लक्षलक्ष तांबे अंगावर रीचवीत रहावं. वेळ क्षणभर थांबावा आणि वर उन्ह असचं बरसत राहवं आणि त्या हव्याहव्याशा वाटणाऱ्या उष्णतेंत हें थंड पाणी अभिषेक पात्रासारखं बरसत रहावं.

कोंडलेल्या मनाच्या दिशा उजळत आहेत. मनांत कांही तरी अनुभूत असं उमलत आहे. हृदयाच्या गहन विचाराच्या दाबाने मिटलेल्या पाकळयांना फुलवण्याची अजब शक्ति त्यांत आहे. मनाचं अभ्राच्छदित आकाश निवळत आहे. माझ्या स्वैरवृत्तीचा, सौंदर्यशोधनाचा, रूपप्रियतेचा कोंडलेला प्रवाह निर्वेधपणें वाहूं लागला आहे. चार दिवसांच्या बंदिस्त अवस्थेतून मी आज बाहेर पडत आहे. आज माझी विचारबंधनं गळून पडत आहेत. मला माझ्या वेगळ्या ब्रह्माचा शोध लागला आहे; त्याचा ठावठिकाणा आज प्रतीत होत आहे. माझ्या आनंदाचा, समाधानाचा मागोवा आज मला घेतां येत आहे.

अंघोळ आटपून मग मी फुलल्या हृदयाने जेवायला बसलों. आज अन्नालासुद्धा एक आगळी चव लागत होती. चार दिवस मला कांहीच गोड लागत नव्हतं, आणि म्हणूनच आज मला अन्न अवीट गोड लागत होतं. मस्तपणें जेवण झालं आणि पलंगावर पडल्या



पडल्या रेडिओच्या स्वरलहरींनी मला निद्रेच्या राज्यांत नेलं. चार दिवस रुसलेली झोंप आज अत्यंत प्रसन्न झाली होती. मध्ये वेळ कसा गेला कुणास ठाऊक ! मी जागा झालों तो प्रतिभेच्या हांकेनेच. पुन्हा एकदा मी अव्यक्तांतून व्यक्तांत, अज्ञातांतून ज्ञातांत आलों होतों : पण संपूर्ण बदलून जाऊन ! चहाच्या कपाने धुंद होत खिडकींतून बाहेरचा निसर्ग पाहतांना मला वाटत होतं:

ह्या दृश्य दिसणाऱ्या मोहक, सुंदर, अवर्णनीय निसर्गापासून ब्रह्माला वेगळं पाहाण्याची जरुरीच काय ? माया जर ब्रह्माचा अंश आहे तर तिला खोटं ठरवणं अंशत: ब्रह्मालाच खोटं ठरविल्यासारखं होणार नाही कां ! नाही, आम्हाला—मला माया खोटी वाटत नाही. माझ्या दृष्टिकोनांतून त्या अनंतविश्वे भरून उरलेल्या परमात्म्याला पाहण्याचा तो एक अमूल्य आणि अनन्यसाधारण असा दर्प आहे. त्याच्या सौंदर्यांतून, हास्यांतून, रूप-गंध-नाद-अविष्कारांतून त्या ब्रम्हाचें अविरत दर्शन होतं. तेव्हा निसर्गापासून जगापासून त्याला वेगळं पाहाणं निदान मला तरी शक्य होणार नाही. त्याच्या अविरत कृपेवर आमचं जीवन-सवस्व अवलंबून आहे. ह्या नवीन विचारांच्या काचेंतून जगाकडे पहातांना मला वाटायला लागलं की,

सकाळीं तो धुंद होऊन गाणारा पक्षी, उडणारी, बवडणारी फुलपाखरं, स्वैरपणें वितानांतून अवगाहन करणारे विहंग. सौंदर्याने रूपाने गंधाने हंसणारी डोलणारी पुष्पं गुंजारव करणारे भ्रमर मी, माझी प्रतिकृतीवत् असलेली प्रतिभा आणि आम्हा दोघांच्या स्वप्न मनोरथांचा आविष्कार असणारी प्रियंवदा सारे आनदप्रवासी आहोत ! ! हें अथांग निळं आकाश, ही हिरवीगार धरणीमाता, हे शुद्ध पवित्र जल, हें जीवनदायी ग्रहताऱ्यांचं तेज आणि अविश्रांत वाहणारा पवन ह्या पंचमहाभूतांच्या अक्षय अखंड नी प्रेमळ आशीर्वादाने जगणारे आम्ही पृथ्वीवरचे आनंदयात्री आहोत ! ! !

●●●




नवें प्रकाशन

महाराष्ट्र राज्य साहित्य
व संस्कृति मंडळ
पुरस्कृत ग्रंथ क्र : १

गुजरातेंतील
मराठी राजवट


वि. गो. खोबरेकर
( मूल्य सात रुपये )

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण पेठ, पुणें २.




महाराष्ट्राची २५ वर्षांची अखंड इंजिनियरिंग
सेवा म्हणजेच...



★ जय भारत ★
• ऑईल इंजिन्स •
★ ५/६ व ८/९ हॉ. पॉ. ची उभी व आडवी इंजिन्स
★ रोलिंग शटर्स उभी व आडवी ★ रोलिंग ग्रिल्स उभी
व आडवी ★ ट्रेलर्स व ट्रॉलीज्, फायर फायटर्स ★
• इरेक्शन् व फॅब्रिकेशन् कॉन्ट्रॅक्टर्स •
उत्पादक : मे. आर्. के. पाटोळे आणि कंपनी
तार ] शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर [ हरीकृपा



वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, सांगली यांच्या
चांचणीस संपूर्ण उतरलेलें....



डायमंड
५ हॉ. पॉ. चें
* उभें इंजिन *
सिंगल सिलींडर
कोल्ड स्टार्ट
चार स्ट्रोक्स
मिनिटास १५००
फेरे
सदैव वापरा

--अधिकृत विक्रेते--
मे. एम्. एच् हुदली ॲण्ड सन्स, शाहुपुरी, कोल्हापूर.
—: उत्पादक :—
डायमंड इंजिनियारिंग वर्क्स
* शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर *
• महाराष्ट्र सरकारने तगईवर मंजूर केलेलें •

४

स. न. वि. वि.

आपलें पत्र बरेच दिवसापूर्वी आलें होतें. आपण लिहिलें त्याप्रमाणे लोकांच्या दृष्टीने मी आता बरीच स्थिरस्थावर झालें आहें, असें म्हणायला हरकत नाही. गेल्या- वर्षी माझ्यासमोर अनेक प्रश्न उभे होते, समस्या होत्या. त्या दुःखांतून डोकें वर काढूनहि चुकतमाकत, रडतखडत सोडविणें भागच होतें. त्या लौकिकदृष्ट्या सुटण्याच्या मार्गांवर आहेत. मला त्या रात्रंदिवस जाचत असल्या तरी लोकांना दिसायला त्या बऱ्याच सौम्य झाल्या आहेत. सर्वांतून जातांना जीवन किती चिवट आहे, ह्याचाहि अनुभव आला.

मी आणि माझी मुलें आमच्या घरांतच राहातों. मुलांच्या शाळा—कॉलेज ठीक चाललें आहे मला घरांत काम आणि जबाबदाऱ्या असूनहि सारें आयुष्य रिकामें झाल्या- सारखें वाटतें. तें अंशतः भरून काढण्याच्या इराद्याने मी एम्. ए. चा अभ्यास सुरू केला आहे. इथ युनिव्हर्सिटींत स्नातकोत्तर वर्ग आहेत. तिथ दुपारीं ११–३० ते ३–३० अशा फार सोईच्या वेळीं क्लासेस् होतात. तिथ मी जाऊं लागलें आहें वय व परिस्थिति (मान- सिक) प्रतिकूल असतांहि एवढा उद्योग करायचें ठरविलें. कारण अभ्यासाच्या विचाराने वेळ योग्य तऱ्हेने काढणें शक्य आहे, असें वाटलें. त्याप्रमाणे मला पुष्कळच यश आलें आहे असें वाटतें. नाहीतर प्रत्यक्षांत मरण नसलें तरी एका अर्थी भावनात्मक मृत्यु होऊन गेले- लाच असतो. आता मी पूर्वीची नाहीं हें माझें मला समजतें तेवढें दुसऱ्या कोणाला कळणार नाही, पण उरलेल्या मी ला इष्ट वळण लावणें भाग होतें.

अभ्यासांत माझा बराच वेळ जातो. ज्या वेळीं पहिल्या दिवशीं कॉलेजांत गेलें, त्या दिवशीं मी चक्कर येऊन पडलें नाहीं, याचेंच आश्चर्य वाटतें. आपले पाय जमिनीला आहेत का नाहीत, याची खात्री वाटत नव्हती. बोलेन तें योग्य बोलेन, हीहि खात्री वाटत नव्हती. असो. सुदैवाने त्यांतूनहि पार पडलें. आता रोजचीच सवय झाली. पंचवीस वर्षांपूर्वींचें रम्य ( आता खरोखरच त्यांची आठवणसुद्धा रम्य वाटते ) दिवस आठवतात. आजूबाजूचें निरागस असें वातावरण पाहून, आपण आपलें अनुभवांचें गाठोडें कुठे तरी ठेवून वयाची वर्षे पुसून टाकावींत आणि पुनः एकदा या नव्या आशा—आकांक्षांचा आस्वाद घ्यावा, असें वाटत, पण माझ्या बाबतींत, पाण्यांत राहून कमळाच्या पानासारखें अलिप्त असें माझें इथलें जीवन आहे, आजूबाजूच्या ताज्या जीवनामुळे ताजेपणाचा थोडासा भास होतो. हेंहि कांही कमी नाही. नाहीतरी, आयुष्यच गौण झालें आहे. मुळचं सारंच संपलं आहे.

सुखच काय, पण स्वतःची दुःखंसुद्धा माणसाला स्वतःलाच हवीं असतात; मला वाटतं त्याहि बाबतींत तो स्वार्थी असतो. त्या दुःखापोटीं जे प्रेम असतं, तें जपून ठेवावसं वाटतं. " पति अचानक मृत्यु पावले. " असें एकलें, वाचलें, की, मला फार मोठा धक्का बसतो. अजून मला तें खरें वाटत नाही. बदली झाली की, दरवेळीं ते पुढे जात व मागून आवराआवरी करून मी जात असें हीच भूमिका आताहि घेतलेली आहे.

असो. पुस्तकाचा भारा पुढे पडला आहे; त्याला हात लावलाच पाहिजे.

आपली
सुमित्रा.

**के. ल. जोग**



# नाही चिरा नाहीं पणती

मीरतला माझी बदली होणार असें मला जेव्हा कळलें, तेव्हा आश्चर्य, आनंद व कांहीशी चिंता यांच्या संमिश्र छटा मनांत उद्‌भवूं लागल्या. उत्तर प्रदेशांतील हें ठिकाण कडक उन्हाळ्या-साठी प्रसिद्ध आहे. आणि माझी बदली तर ऐन उन्हाळ्याच्या तोंडाला झालेली. तेव्हा तेथील कडक उन्हाळ्यांत आपला निभाव कसा काय लागेल असा प्रश्न मनास एकसारखा सतावूं लागला. तरी पण नवीन ठिकाण म्हटलें की, तेथे सर्वच नवें व विशेषत: सदर गांव म्हणजे १८५७ च्या भारतीय स्वातंत्र्ययुद्धाचें उगमस्थान किंवा स्फूर्तिस्थान आपणास अगदी जवळून पाहायास मिळणार या सुखद जाणिवेने प्रथम कांहीशा रूक्ष बनलेल्या मनांत थोडी समाधानाची हिरवळ निर्माण झाली. मीरत हें शहर डेहराडून एक्सप्रेसच्या मार्गांत दिल्लीच्यापुढे ४२ मैलांवर आहे. नोकरीच्या नवीन ठिकाणीं गेल्यावर प्रथम करावें लागणारें सव्यापसव्य पार पडलें व नंतर शहरांत भ्रमंती करावयास प्रारंभ केला, पण मला खरी ओढ नरवीर मंगल पांडे यांचें स्मारक पाहावयाची असल्याने मी प्रथम मित्रासह तिकडेच मोर्चा वळविला.

मीरत छावणीच्या स्टेशनपासून पदयात्रा सुरू केली. प्रथम आमची कल्पना ही की, पुण्यांत आलेल्या कोणत्याहि पाहुण्याने शिवाजी महाराजांचा लाल महाल असलेली जागा म्हणजे जिजामाता बाग विचारावी व कोणीहि त्या ऐतिहासीक वास्तूची निश्चित जागा सांगावी. तसेंच येथेहि घडेल म्हणून वाटेंत भेटणाऱ्या बऱ्याच भिन्न व्यवसायी मंडळींना वीर मंगल पांडे स्मारकासंबंधी विचारलें. पण नकारच पदरीं येऊं लागले. शेवटीं मंगल पांडे हा १८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धांत भाग घेणारा किंबहुना त्याची सुरुवात करणारा एक लष्करी जवान असल्याने, त्याची योग्य ती माहिती शेजारीच पहाऱ्या-वर उभ्या असलेल्या शीख सैनिकाकडे मिळेल असें वाटल्यावरून, मीं त्यास सत श्री अकाल (शिखांचा रामराम) करून खडा टाकला, पण त्याने आँ ऽ ऽ असें तोंड वेंगाडून असा कांही तिरस्कार दर्शविला की, करायची काय मला त्या मंगल पांड्याची चौकशी करून असेंच एका-द्याला वाटावें. तरीपण माझ्या जिज्ञासु मनाची ओढ कांही कमी होईना. शेवटीं एका सायकल रिक्षावाल्यास गाठलें. रिक्षांतून थोडीशी सफर केल्यानंतर आम्ही एका अशोक स्तंभाजवळ जाऊन पोचलों. तेथे कांही विद्यार्थी (बहुदा महाविद्यालयीन असावेत ते) त्या अशोक स्तंभाच्या सावलीला व हिरवळीवर पहुडलेले दिसले. मीं अमळ विसावा घेऊन परत महाराष्ट्रीय पद्धतीची चौकशी सुरू केली. माझें विशेष कुतूहल पाहून त्यांतील एकाने सरळ विचारलें, “साब, बडी छानबीन हो रही है, आखीर बात तो क्या है? हमे जरा बता तो दो.” “आप कहांके रहनेवाले हो?” दुसरा विचारता झाला. मीं पुण्याचें नांव सांगतांच तिसरा एक खुशाल चेंडू म्हणाला. “साब, आपका पूना मैने देखा है. बहुत अच्छी जगाह है, ना गरमी ना सरदी


उदर की हवा हमे बहोत पसंद आयी " मघाच्या दुसऱ्या मुलाकडे पाहून तो पुढे सांगूं लागला. " शिवाजी मरठ्ठा पूनेकाही तो रहनेवाला था. (आमच्या शिवाजी महाराजांना येथील पंजाबी निर्वासित शिवाजी मराठ्ठा असें संबोधितात !) वडा बहादूर राजा था " वगैरे वगैरे. या नवीन "माहिती" मुळे मूळ विषय बाजूलाच राहिला. अखेर मीं त्यांचा निरोप घेतला.


शिवाजीचें नांव एकंदरीत या २० व्या शतकांतल्या परप्रांतीय विद्यार्थ्यांपर्यंत पोचलेलें पाहून मनास जरा बरें वाटलें, पण ज्या वीर मंगल पांड्यांच्या बहादुरीमुळे मीरतचें नांव १०० वर्षांपूर्वी भारतांत सर्वत्र गाजलें किंवहुना आजहि तो एक अभिमानाचा विषय इतिहास षौकीनांना वाटतो, त्या वीराची वास्तु असलेली नक्की जागा कांही कोणास सांगतां येत नव्हती याचा मला मोठा विषाद वाटला व परत उन्हांतून भ्रमंती सुरू केली.

अखेरीस आमच्या वर्कशॉपमधला एक कामगार भेटला व त्याने सांगितलें की, तुम्ही नुकताच पाहिलेला ८४ फुटी अशोक स्तंभ हा गेल्या ४–५ वर्षांत मीरत नगरपालिकेने बांधलेला आहे. स्वातंत्र्य-संग्रामाच्या सुरुवातीची ती मूळ जागा नव्हे. नंतर त्याच्या माहिती-प्रमाणे परत उन्हातान्हांतून शोधाशोध सुरू केली व शेवटीं आम्ही एका कमानीपाशी येऊन पोचलों. त्यावर " १८५७ सालीं या ठिकाणीं सिम्सन नांवाचा गोरा डेप्युटी कमिशनर राहात असे " असा इंग्रजींत लिहिलेला मजकूर दिसला. आंत जातांच बटाटयाच्या पिकाची निगा राखणारा एक माळी दिसला. परत चौकशीचीं चक्रें सुरू केलीं. त्याने मधोमध असलेलें एक अगदी पडीक झालेलें ठिकाण दाखविलें. ठिकाण कसलें ! तो एका विटांच्या खांबाचा अवशेष दिसत होता व ह्याच ठिकाणीं वीर मंगल पांडे याने १८५७ ची सुरुवात केल्याचा त्या माळ्याने निर्वाळा दिला ! प्रथम आमची समजूत अशी झाली होती की, तेथे बहुधा मंगल पांड्यांचा पुतळा असावा, पण कसलें काय ! सबंध पुरंदर किल्ला पालथा घातल्यानंतर ज्या ठिकाणी " शिरावाचुनी धड लढवूनी " ज्या मुरारबाजीने पराक्रमाची शर्थ केली होती त्या ठिकाणीं कोठे तरी उन्हापावसाच्या माऱ्यांत एक स्मृति-रूपी कोरीव दगड पडलेला आम्हीं मागे पाहिला होता. त्याची यावेळीं नेमकी आठवण झाली. ज्या १८५७ स्वातंत्र्य समरामुळे भारतांतील शेकडो संस्थानिक गेलीं शंभर वर्षे (किंवहुना अजूनहि) सुखेनैव तनखे घेत आहेत व ऐषआरामाने राहात आहेत त्या पैकी एक लाहि, किंवहुना भारत सरकारलाहि या हुतात्म्याचा पुतळा तेथे उभारण्याचें भान राहूं नये याचें मोठें दुःखद आश्चर्य वाटलें. याच ठिकाणीं नरवीर मंगलपांडे यांनी स्वातंत्र्ययुद्धांतील पहिली गोळी ९ मे १८५७ ला झाडली व गोऱ्या साहेबास घोड्यावरून अक्षरशः धराशयी केलें. नंतर स्वतःहि तो भगतसिंगासारखा हंसतमुखाने फांसावर गेला, पण यामुळे स्वातंत्र्य-युद्धाची आग न विझतां ती अधिकच पसरली व दुसऱ्या दिवशीं इतर सैनिकांनी मंगल पांडेस देहदंडाची सजा देणाऱ्यास यम-पुरीचा रस्ता दाखवून दिल्लीस कूच केलें. यानंतर जनक्षोभाच्या ज्वालामुखीचे स्फोट साऱ्या भारतांत झाले व त्यांनी इंग्रजांस बराच काळ अगदी पळतां भुई थोडी केली, पण या परवशतेंतील अन्यायाला खरी वाचा प्रथम ज्या मंगल पांडेनी फोडली त्याचा मीरत-मधील जनतेस अद्याप मोठा अभिमान वाटतो. मीरतवासीयांनी केवळ स्मृति म्हणून आज येथील बाजारास " वीर मंगलपांडे मार्केट " असें नांव दिलेलें आहे.

वरील पडीक खांबाशेजारीच एक जीर्ण झालेली विहीर दिसली. यांतील पाणी वंडापूर्वी पिण्यास वापरत असत, पण धुमश्चक्रीच्या काळांत त्यांत शत्रूची प्रेतें फेकलीं गेलेली होती असें समजलें.

● ● ●






दणकट, टिकाऊ व लांबरुंद उत्तम घोंगडी....

**सणगर घोंगडी उत्पादक सह.**

**मंडळी लि., पेठ वडगाव**

★ येथेच खरेदी करा ★

—सेक्रेटरी— विष्णु शंकर गुरव.

--चेअरमन-- कोंडीबा चोपडीबा गोंजारे

★ रुपयास १९ न. पै. रिबेटची सवलत ★

# लोकशाही विकेंद्रीकरण

## : १ :

### लोकशाही विकेंद्रीकरणाचा उगम

मे महिन्यांत महाराष्ट्र राज्यांत सुरू होत असलेल्या लोकशाही विकेन्द्रीकरण प्रयोगाचें मूळ उगमस्थान लॉर्ड रिपन यांचा १८ मे १८८२ चा सुप्रसिद्ध ठराव होय. विकेन्द्रीकरणावर आज घेतले जाणारे आक्षेप कमी-जास्त स्वरूपांत तेव्हाहि या स्थानिक स्वराज्याच्या रिपन-ठरावावर घेतलें गेलें होते व आज ह्या आक्षेपांना दिलीं जाणारीं उत्तरें तेव्हाहि दिलीं गेलीं होतीं. हें पाहून मनुष्य स्वभावाच्या सारखेपणाचें कौतुक वाटतें. १८८२ च्या त्या सुप्रसिद्ध ठरावांतील कांही परिच्छेद ऐतिहासिकदृष्टचा आज पाहण्यासारखे आहेत.

" प्रथमतः गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल असें स्पष्ट करूं इच्छितात की, स्थानिक स्वराज्याच्या तत्त्वाचा पुरस्कार केल्यामळे आणि स्थानिक बाबींच्या अनेक शाखांच्या कारभारांत त्या तत्त्वाचा अवलंब केल्यामुळे जिल्हा पातळीवरील सरकारी अधिकाऱ्यांमार्फत होणाऱ्या कामापेक्षा सुरुवातीस अधिक चांगलें काम होईल असें त्यांनाहि वाटत नाही. प्रमुखतः राज्यकारभारांत कांही सुधारणा घडवून आणण्याच्या हेतूने हा उपाय सुचविलेला किंवा पुरस्कारिलेला नाही. मुख्यतः राजकीय शिक्षणाचें व लोकशिक्षणाचें एक साधन म्हणून त्याची आवश्यकता आहे. स्थानिक जनतेचें ज्ञान व स्थानिक हितसंबंध यांचा स्थानिक कारभारावर जसजसा अधिक प्रभाव पडत जाईल तसतशी कार्यक्षमतेंत सुधारणा होईल, यावद्दल हिज एक्सलन्सी इन् कौन्सिल यांना मुळीच शंका वाटत नाही. अर्थात् सुरुवातीला अनेक वेळां अपयश येईल व त्यामुळे अवास्तव आशा नष्ट होतील आणि कांहीवेळां खुद्द स्थानिक स्वराज्याच्या पद्धतीच्या अंमलबजावणीची सकृद्दर्शनी अपकीर्ति होण्याचीहि त्यामुळे शक्यता आहे. जर सरकारी अधिकाऱ्यांनी लहान प्रमाणांत सुरू होणाऱ्या या स्वतंत्र राजकीय जीवनाच्या प्रयोगाला सुरुवातीस परिश्रमाने जोपासलें, हें सरकारी धोरण हें आपलें धोरण आहे असें समजून त्याचा त्यांनी इमानेइतबारे स्वीकार केला आणि एकतंत्री कारभाराच्या बदली सुरू होणाऱ्या या नव्या कारभारांत खरोखरच आपल्या कारभारविषयक कौशल्याला आणि मार्गदर्शनपर कुवतीला अधिक चांगलें क्षेत्र मिळणार आहे याची जाणीव ह्यांना झाली तर हा अपयशाचा काळ फार थोडा राहील आणि खरी व भरीव प्रगति लवकरच दृष्टोत्पत्तीस येईल अशी आशा करावयास हरकत नाही. "

परंतु लॉर्ड रिपन व त्यांच्यासारख्या इतर कांही पुरोगामी ब्रिटिश मुत्सद्यांनी बाळगलेला आशावाद परिस्थितीने फोल ठरविला. रिपन यांच्या ठरावाला मूर्त स्वरूप देण्यासाठी ज्या संस्था उभारल्या गेल्या, त्या क्वचितच प्रातिनिधिक अगर स्वायत्त होत्या. त्यांना दिलेले अधिकार अनेक दृष्टीने तुटपुंजे होते व त्यांची आर्थिक साधनें इतकीं मर्यादित होतीं की, स्थानिक स्वराज्यशासनाचें शिक्षण देण्याच्या कामीं त्या जवळजवळ कुचकामी ठरल्या. याशिवाय, ज्या शासकीय अधिकाऱ्यांचें कर्तव्य ह्या संस्थावर देखरेख ठेवून त्यांना मदत करणें, धोरण मान्य करणें व बेदरकारी, मार्गदर्शन आणि हस्तक्षेप यांतील फरक स्पष्टपणें ओळखणें असें होतें त्यांना आपल्या या कर्तव्याचें आकलन नीट न झाल्यामुळे स्थानिक संस्थांच्या कामकाजांत नेहमी अडथळे येत गेले.

## : २ :

### विकेंद्रीकरणाचे दोन मूलभूत उद्देश

पंचवार्षिक योजनेद्वारे सुरू झालेले ग्रामीण विकासाचे सर्व कार्यक्रम सुसूत्र व आटोपशीर संघटनेच्या अभावी असफल ठरत आहेत असा गेल्या दहा–बारा वर्षांतील अनुभव आहे. स्वातंत्र्यपूर्वकालांत स्थानिक स्वराज्याच्या कारभारासाठी स्थापन झालेल्या ग्रामपंचायती, लोकलबोर्डस्. जिल्हा विकास–मंडळें इत्यादि सर्व संस्था ग्रामीण विकासाची नवी जबाबदारी पेलण्यास असमर्थ ठरत होत्या. याचीं कारणें सांगतांना नाईक समितीचा लोकशाही विकेंद्रीकरण अहवाल म्हणतो— " प्रांतिक स्वायत्तता सुरू झाल्यापासून महाराष्ट्रांतील सर्व जिल्ह्यांमध्ये विविध स्थानिक स्वराज्य संस्थांची जी वाढ झाली त्यांचीं महत्त्वाचीं वैशिष्टचें आम्हीं या प्रकरणांत संक्षेपाने सांगितलीं आहेत. यावरून गेल्या कांही वर्षांमध्ये या संस्थांची जी वाढ झाली तिच्यामागे एखादी निश्चित योजना किंवा कार्यक्रम नव्हता, तर प्रत्येक वेळीं या संस्थांबाबत ज्या ज्या अडचणी पुढे आल्या त्यांचा साकल्याने विचार झाला नाही असें दिसून येईल. कांही काळ या संस्था वाढीस लागल्या; त्यांची शक्ति व उपयुक्तता याविषयी संशय नाही, मात्र या संस्थांच्या आयुष्यांत निराशेचे व भ्रमनिरासाचे प्रसंग आले. प्रत्येक प्रसंगास तोंड देण्यासाठी एकांगीपणें करण्यांत आलेल्या प्रत्येक प्रयत्नामुळे आपापल्या क्षेत्रांत काम करणाऱ्या विविध समित्यांची संख्या वाढत गेली. गेल्या कांही वर्षांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वाढीबाबतची डोळचांत भरण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांची वाढती संख्या होय. परंतु या स्थानिक स्वराज्य संस्थांशी संलग्न असलेल्या सर्व प्रश्नांचा साकल्याने विचार करण्याचा प्रयत्न करण्यांत आलेला नाही. त्यामुळे विकसित अर्थव्यवस्थेकरितां अत्यावश्यक असलेली एकसूत्रता, वेग या गोष्टी न साधणें साहजिक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचें कार्य योग्य रीतीने पार पडण्याकरितां स्थानिक शासनव्यवस्था पूर्ण विचारांती बनविलेली, एकसूत्रित असलेली व निश्चित स्वरूपाची असणें आवश्यक आहे. "

यावरून स्थानिक स्वराज्य संस्थांचा आजचा फापटपसारा कमी करून विकासासाठी एक सुसूत्र व संघटित शासन–व्यवस्था उभी करणें हा लोकशाही विकेंद्रीकरण प्रयोगाचा एक उद्देश आहे ही गोष्ट स्पष्टपणें ध्यानांत येते.

लोकशाही विकेंद्रीकरणाची आवश्यकता आणखी एका व्यावहारिक कारणासाठी भासते. स्वातंत्र्यपूर्वकाळांत मध्यवर्ति व राज्य सरकारें कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करणें, चालू महसुलांतून करतां येतील तेवढचाच सुखसोयी लोकांना उपलब्ध करून देणें व साम्राज्यशाही हितसंबंधाला बाध येणार नाही एवढाच मर्यादित आर्थिक विकास करणें या गोष्टींवरच समाधान मानीत असत. स्वातंत्र्योत्तर काळांत साहजिकच हें धोरण बदललें. कायदा व सुव्यवस्थेऐवजी

# कां व कसे ?

विकासाला प्राधान्य मिळालें आणि आपली सर्व शक्ति वेचून लोकांचें जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने मूलभूत प्रश्न सोडविण्याची जबाबदारी मध्यवर्ति व राज्य सरकारांवर येऊन पडली. पोलादाचें उत्पादन, वीज उत्पादन, मोठ्या यंत्रांचें उत्पादन, नदीखोऱ्यांच्या योजना, शास्त्रीय व तांत्रिक प्रगति, शेती व पाणीपुरवठ्याच्या मोठ्या योजना राष्ट्रीय सडका, जमिनीचें मोठ्या प्रमाणांत संरक्षण, पशुपालन व दुग्धव्यवसाय इत्यादि मूलभूत राष्ट्रीय कार्यक्रम आंखण्याची व राबविण्याची जबाबदारी त्यांना पत्करावी लागली. त्याचवेळी ग्रामीण जनतेकडून येणाऱ्या दडपणामुळे सरकारला स्थानिक स्वरूपाच्या विविध कार्यक्रमांनाहि सुरुवात करावी लागली. ज्यांच्याकडे अशा प्रकारच्या योजना वा कार्यक्रम सोपविणें शक्य झालें असतें. अशा विविध स्थानिक स्वराज्य संस्था आस्तित्वांत होत्या. पण पैसा, मनुष्यबळ व शिस्तशीर संघटना यांचे अभावामुळे ही जबाबदारी पार पाडण्यास त्या असमर्थ ठरल्या. परिणामीं मोठ्या सरकारी योजना व छोटे स्थानिक कार्यक्रम पार पाडण्यामध्ये सरकारची शक्ति विभागली गेली आणि त्याचा परिणाम असा झाला की, मोठ्या योजनांना, त्यांची निवड व जरूरी लक्षांत घेतां साहजिकच अग्रस्थान मिळालें व स्थानिक कार्यक्रमांकडे दुर्लक्ष झालें. राष्ट्राच्या दूरगामी विकासाच्या दृष्टीने ही एक अनिष्ट व दुर्दैवी घटना होती आणि म्हणून स्थानिक कार्यक्रमांबाबतच्या जबाबदारींतून राज्य सरकारांनी मुक्त होणें आवश्यक असून स्थानिक कामें लोकांच्या उपक्रमशीलतेवर व उपलब्ध साधनांवर सोपविण्याची गरज आहे.

**: ३ :**

## विकेंद्रीकरण कायद्याचें स्वरूप

स्थानिक उपक्रमशीलता वाढावी व विकासासाठी आटोपशीर व साचेबंद शासनव्यवस्था उभी करावी या दोन उद्दिष्टांना धरूनच लोकशाही विकेंद्रीकरणाचा कायदा तयार करण्यांत आलेला आहे. या कायद्यान्वयें जिल्हा, तालुका, गट आणि ग्रामपंचायत या तीन पातळींवर लोकशाही संस्था अस्तित्वांत येणार असून या संस्थांकडे पुरेसे अधिकार व उत्पन्नाच्या बाबीहि सुपूर्त करण्यांत आलेल्या आहेत. उदारहणार्थ–जिल्हा लोकल बोर्डाचें प्रत्येकी सरासरी विद्यमान उत्पन्न सुमारे पंचवीस लाख रुपये आहे. नवीन अस्तित्वांत येणाऱ्या जिल्हा परिषदेचें उत्पन्न सरासरी सव्वा कोट—सध्यापेक्षा पांचपट अधिक—रुपये एवढें राहणार आहे. तसेंच संशोधन, राज्य सरकारच्या तांत्रिक संस्था, विश्वविद्यालयीन शिक्षण, राष्ट्रीय व प्रांतीय राजमार्ग, जनावरांची पैदास करण्याचीं मध्यवर्ति केंद्रें, औद्योगिक क्षेत्रांची वाढ अशांसारख्या व्यापक महत्त्वाच्या बाबी वगळल्या तर शक्य तेवढीं कामें स्थानिक संस्थांकडे सुपूर्त करण्याकडेच या कायद्याचा रोख आहे. स्थानिक उपक्रमशीलता वाढावी या उद्देशाला धरूनच जिल्हा परिषद, गट, तालुका समिति या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना आकर्षक मान वेतनें व प्रवासभत्ते देण्याची तरतूद या कायद्यांत केलेली आहे. उदाहरणार्थ, जिल्हा मंडळाचे अध्यक्ष व मंडळाच्या निरनिराळ्या पोट समित्यांचे अध्यक्ष यांचें मासिक मानधन अनुक्रमे ५०० व ३०० रुपये राहणार असून गरज भासेल त्याप्रमाणे राहण्याच्या जागेची तरतूदहि मंडळाने यांचेसाठी करावयाची आहे. प्रवासभत्ता व दैनिक भत्ता यासाठी या पदाधिकाऱ्यांना प्रथम दर्जाचे अधिकारी समजण्यांत येणार आहे. गट–तालुका समितीच्या अध्यक्षाला मासिक तीनशे रुपये व उपाध्यक्षाला दीडशे रुपये असें मानधन ठरलें असून यांनाहि प्रथम दर्जाच्या अधिकाऱ्यांचे प्रवास व इतर भत्ते देण्यांत यावयाचे आहेत.

लोकांनी निवडून दिलेल्या या प्रातिनिधिक स्थानिक संस्थांनी आखलेलीं धोरणें व योजना कार्यवाहीत आणण्याच्या दृष्टीनेच जिल्ह्यांतील प्रशासकीय यंत्रणा तयार करण्यांत आलेली आहे. एक मुख्य जिल्हा प्रशासक व त्याच्या अधिकाराखाली स्थानिक योजनांबाबत महत्त्वाचीं असलेलीं सर्वसाधारण, अर्थ, बांधकाम, शेती, सहकार, उद्योग, आरोग्य आणि शिक्षण हीं सात खातीं अशी ही सूत्रबद्ध कारभारयंत्रणा जिल्ह्याच्या ठिकाणीं उभी राहील. तालुक्याच्या पातळीवर गट विकास अधिकारी प्रशासकीय अधिकार धारण करील. राज्य सरकारचा प्रतिनिधि म्हणून जिल्ह्यांत कलेक्टरची जागा कायम राहणार आहे. आज स्थानिक स्वराज्य संस्थांकडे असलेला सर्व नोकरवर्ग व नवीन कांहीं या नव्या व्यवस्थेकडे देण्यांत येणार असून यामुळें अंमलबजावणी यंत्रणेंतील आजचा पुनरावृत्तीचा व अनावश्यक फापटपसाऱ्याचा दोष कमी होण्याची बरीच शक्यता आहे. या पुर्नघटनेमुळे दरसाल सुमारे पंधरा लाख रुपयांची बचत होणार असून कचेऱ्यांची आताची संख्याहि बरीच कमी होईल असा नाईक समितीचा अंदाज आहे.

●●●




※ कोल्हापुरांत नवीन ※

स्वच्छता, प्रशस्त खोल्या आणि उत्कृष्ट आदरातिथ्यासाठी...

**रंजन लॉजिंग-बोर्डिंग**


• लक्ष्मीपुरी, कोल्हापूर •

★ भोजनाची सोय लौकरच सुरू होत आहे ★

# लोहगांव विमानतळावरील

# मोटार सायकल स्पर्धा

* * * विद्याधर



अखिल भारतीय मोटार सायकल व मोटारकार स्पर्धांपैकीं अत्यंत नांवाजलेली व महत्त्वाची अशी स्पर्धा मार्चच्या पहिल्या आठवड्यांत पुण्याजवळील लोहगांव विमानतळावर झाली. गेल्या दोनतीन वर्षांत या स्पर्धांचा बराच गाजावाजा झाल्याने यंदा बरीच मंडळी लोहगांव तळावर आलेली दिसली. या सर्व लोकांची व्यवस्था-देखील फारच चांगली केलेली होती.

परंतु यंदाच्या स्पर्धांत, फारसे नांवाजलेले स्पर्धक आलेले नसल्याने प्रेक्षकांची फारच निराशा झाली. त्यांतच या स्पर्धांचे मुकुटमणी कै. शंकरराव वर्तक यांची अनुपस्थितीदेखील स्पर्धेचें आकर्षण कमी करण्यास कारणीभूत ठरली होती. नाही म्हणायला मोटारसायकल स्पर्धेत सॅमसार्डी यांनी जवळ जवळ पांच वर्षांनी पुन्हा भाग घेतला होता. तसेंच मोटरकार स्पर्धेत इटलीचे डॉ. सी. रोसी यांनी भाग घेतला होता.

पहिल्या दिवशीं फक्त मोटारसायकलच्याच शर्यती झाल्या. त्यांत १५० सी. सी सहा मैलाच्या शर्यतींत श्री. देशमुख यांनी हें अंतर ७ मि. ३ सेकंदांत तोडून नवीन विक्रम प्रस्थापित केला. तसेंच ५०० सी. सी. १८ मैलांच्या शर्यतींत मुंबईच्या रमेशकुमार यांनी आपल्या ट्रीस्टारने हें अंतर १५ मि. ३५ सेकंदांत तोडून व २५० सी. सी च्या ९ मैलाच्या शर्यतींत बंगलोरच्या विजय पाळ यांनी आपल्या ट्रायम्फवर हें अंतर ८ मि. ५६ सेकंदांत तोडून विक्रम प्रस्थापित केले. हेंच काय ते यंदाच्या वर्षीचे विक्रम !

दुसऱ्या दिवशीं रविवार असल्याने व गेल्यावर्षीपासून नव्यानेच सुरू केलेल्या मोटरकारच्या रेसमुळे अधिक गर्दी झाली होती. सुरु-वातीला स्कूटर रेसेस झाल्या. पुरुष विभागांत श्री. लडक यांनी यंदा गेल्यावर्षीचे विजेते श्री. शिरोडकर यांच्यावर मात केली. श्री. लडक यांची "व्हेस्पा ट्रेड एंट्री" होती. आणि त्यांनी आपल्या कौशल्याने पुढे १५० सी. सी मोटरसायकल स्पर्धेतदेखील भाग घेऊन प्रथम क्रमांक मिळवून दाखविला. स्त्रियांच्या स्पर्धेत श्रीमती एल्. मॅन्युएल यांनी कुमारी दोरा निकल्स् यांच्यावर विजय मिळविला.

२५० सी. सी. मोटर सायकल स्पर्धेत सॅम सार्डी यांनी भाग घेतला होता. त्यांची आयडियल जावा ही इतर मोटर सायकलसपेक्षा फारच जोरकस ठरली. वळणावर किंवा सरळपथावर सहज सुलभ-तेने ती जाऊं शकत असल्याने सॅम सार्डी विजयी झाले. परंतु पुढील सर्व स्पर्धांत त्यांनी प्रेक्षकांची निराशा केली. ३५० सी. सी. त ते दुसरे आले व इतर सर्व स्पर्धांतून त्यांनी नांव काढून घेतलें.

३५० व ५०० सी. सीं त कमरू टायरवाला पहिले आले. ५०० सी. सी स्पर्धेत अशोक शहा बरेच पुढे असतांनासुद्धा आपल्या कौश-ल्याने टायरवाला यांनी त्यांना शेवटीं अगदी मागे टाकलें.

मोटरकार स्पर्धांत गेल्यावर्षी चार स्पर्धांत पहिले येणाऱ्या गोंड-लच्या युवराजांनी यंदा निराशा केली. ते केवळ स्पोर्टस्‌कार रेसमध्ये पहिले येऊं शकले. तेदेखील त्यांच्या स्पोर्टस्‌कारमुळे (मर्सिडीझ्) नाही-तर त्यांचें ड्रायव्हिंग कौशल्य अजिबात नजरेंत भरण्यासारखें नव्हतें.

१५०० सी. सीं. त प्रविणकुमार ( स्टँडर्ड हेरल्ड ) पहिले आले. त्यांची कार वळणावर फारच मंद असे व त्याचवेळी त्यांचे प्रतिस्पर्धी त्यांच्यावर आघाडी मारीत, परंतु सरळमार्गावर मात्र ते त्याचा वचपा काढीत असल्याने पहिले येऊं शकले.

या स्पर्धांत हाजी सत्तार यांनी मात्र अगदी कमाल केली. फियाट ( ११०० ) या त्यांच्या मोटारींतून त्यांनी जेवढ्या शक्य होत्या तेवढ्या सर्व स्पर्धांत भाग घेतला होता.

ऑलकमर्स हॅन्डीकॅप स्पर्धेत तिघांनीच भाग घेतला होता. हाजी सत्तार (फियाट ११००), महाराज ऑफ प्रतापगड (जागोर XK 120) व डॉ. सी. रोसी (आल्फा रोमिओ.) मोटारच्या अश्वशक्तीवर हॅन्डीकॅप अवलंबून असल्यामुळे प्रथम फियाट, मग ३५ सेकंदांनी जागोर व नंतर ४१ सेकंदांनी आल्फा रोमिओ सोडल्या. आल्फा रोमिओला दिलेला वेळ फारच होता असें सगळ्यांचेंच मत पडलें. तरी ती गाडी दुसरी आली.

स्पोर्टस्‌कार स्पर्धेत गोंडलच्या युवराजांची मर्सिडीझ् पहिली, श्री. एस्. एच्. कमिसारिअट यांची स्टेडबेकर गोल्डन हॉक दुसरी. व डॉ. रोसी यांची आल्फा रोमिओ तिसरी आली. हीच स्पर्धा प्रेक्षणीय झाली. कारण मोटर स्पर्धांमधील वेगाला जें महत्त्व आहे तें याच स्पर्धेत दिसून आलें. महाराज ऑफ् प्रतापगड यांची गाडी जागोर XK-120 या विभागांत चौथी आली, पण आधीच्या स्पर्धांत जरी त्यांनी फारशी कांही कामगिरी केलेली नव्हती व याहि स्पर्धेत ते क्रमांक मिळवूं शकले नाहीत, तरी त्यांनी आपलें ड्रायव्हिंग कौशल्य चांगलेंच दाख-

( पान २३ वर चालू )

# डेक्कन मोटरसायकल स्पोर्टस् क्लब

## प्रेक्षक व स्पर्धक यांची वाढती उदासीनता ?

डेक्कन मोटर सायकल स्पोर्टस् क्लब १९४९ मध्ये जवळ जवळ २० उत्साही लोकांनी स्थापन केला. सुरुवातीला अगदीच लहान प्रमाणांत स्पर्धा होत. पुढे १९५५ सालीं त्याला अखिल भारतीय मान्यता मिळाल्याने या स्पर्धा मोठ्या प्रमाणावर घेण्यांत येऊं लागल्या. त्यामुळे सर्वश्री शंकरराव वर्तक, सॅम सार्डी, मार्शल, मास्टर, दारुवाला, टायरवाला वगैरे नाणावलेले लोक या स्पर्धांत भाग घेऊं लागले व त्यामुळे प्रेक्षकदेखील बरेच येत, परंतु गेल्या दोन-तीन वर्षांत प्रेक्षकदेखील फारसा उत्साह दाखवीत नसल्याने व बाहेरील लोकहि कमी भाग घेत असल्यामुळे पूर्वीचा जोर सध्या नाही.

सध्या या क्लबचे ३७० चे वर सभासद आहेत. श्री. नौशेर इराणी हे प्रेसिडेन्ट व श्री. शरद दाभाळकर, श्री. तालीब खंबाटा हे सेक्रेटरी आहेत. सध्या या स्पर्धा लोहगांव विमानतळावर घेतल्या जातात. हा विमानतळ आता भारतीय हवाई दलाच्या ताब्यांत असल्याने या स्पर्धा घेण्यांत फारच अडचणी येतात, तसेंच तो गांवापासून फारच दूर असल्यामुळे केवळ ज्यांच्याजवळ स्वयंचलित वाहनें आहेत ते किंवा जे अगदीच उत्साही आहेत असेच लोक तेथे सायकलवर किंवा कसेहि जातात. नजीकच्या काळांत जर शक्य होईल तर स्वतःचा एक स्पर्धामार्ग ( Track ) तयार करण्याचें क्लबच्या मनांत आहे. अर्थातच लोकांनी योग्य तो पाठींबा दिला तरच ही गोष्ट लवकरांत लवकर होण्यासारखी आहे. सध्याचा लोहगांवचा मार्ग मात्र भारतांतील सगळ्यांत जलद मार्ग आहे. त्यामुळे स्पर्धक भाग घ्यायला नेहमीच तयार असतात. नवा मार्ग बांधतांना तोदेखील असाच होईल हीच काळजी बाळगायला पाहिजे. नवीन मार्ग तयार करायला लागणारी पैशाची मदत सरकार थोडीकार करीलच, परंतु बाकीची रक्कम लोकांनी दिलेल्या निधींतून व कदाचित कार्यकारिणीच्या खिशांतूनच जमवायला पाहिजे. आतापर्यंत कित्येक स्पर्धा अशाच यशस्वी झाल्यामुळे कार्यकारिणीला पैसे सहज जमतील अशी उमेद आहे, परंतु सुधारलेल्या जगाबरोबर जातांना त्याच्या सुधारलेल्या खेळांशीपण समरस होण्याची लोकांनी तयारी ठेवली पाहिजे. मोटरसायकल किंवा मोटर रेसेस कांही दिवसांनी श्रीमंतांचेच खेळ न राहतां सर्वसाधारण माणसालासुद्धा त्यांत भाग घेतां येईल. तेव्हा अशा या खेळांकडे लोकांनी दूरत्वाने न पाहतां क्रिकेट हॉकी वगैरे खेळांच्याइतकें जरी नाही तरी योग्य त्या दृष्टीने पाहणें जरूर आहे.

एकदा स्पर्धा संपल्यावर या क्लबच्या हालचाली थांबत नाहीत. त्यांच्या इतर गोष्टीपण चालू असतात. रिलायबिलिटी ट्रायलस् (विश्वसनीयता चांचणी), पेट्रोल कन्स्म्पशन् टेस्ट ( इंधन चांचणी ), हिल् क्लाइम्ब ( टेकडी चढण ) वगैरे चांचण्या किंवा स्पर्धा चालूच असतात.

असा हा क्लब पुण्यांत आहे याची जाणीव केवळ कांही लोकांनाच आहे, परंतु यंदा इटलीच्या डॉ. रोसीनी, बंगलोरच्या विजय पालनी किंवा सिलोनच्या सॅम सार्डीनी ज्या स्पर्धांत भाग घेतला होता ती स्पर्धा निश्चितच कांही पातळीची आहे. तेव्हा पुणेकर तरी निदान अशा स्पर्धा चुकविणार नाहीत अशी आशा वाटते.

●●●

---

( पान २२ वरून चालू )

वून दिलें. विशेषतः कोणत्याहि वळणावर त्यांचा वेग व गाडीवरील ताबा इतरांपेक्षा निश्चितच डोळ्यांत भरण्यासारखा होता.

सबंध स्पर्धेंत जर कोणीं प्रेक्षकांना हादरवून सोडलें असेल तर तें श्री. मझदा यांनी ५०० सी. सी मोटरसायकल स्पर्धेत. याच स्पर्धेत अगोदर एकजण मोटरसायकल मार्गांतून बाजूला जाऊन शेतांत कोलमडला होता. श्री. मझदादेखील एकदा असेच बाजूला गेले, परंतु त्यांनी परत गाडी काबूंत आणून मार्गावर आणली होती. ते वळतांना इतके तिरपे होत की त्यांचा पाय त्या पट्टयावरून घासून जातो आहे किंवा काय या भीतीने प्रेक्षक उभे राहत.

असा हा कार्यक्रम रविवारीं दोन वाजतां संपला. प्रत्येक स्पर्धेनंतर लगेच बक्षिसांचें वांटप झालेलें असल्या कारणाने प्रेक्षकांना बक्षीस-समारंभाकरितां थांबावें लागलें नव्हतें. एकूण व्यवस्था व विशेषतः उन्हापासून बचाव यामुळे कार्यक्रमावर प्रेक्षक खूष होते.

●●●

(आमच्या प्रतिनिधीकडून)

## शालेय शिक्षकांच्या जीवनावरील एक 'सुमार' नाटक

# अेक दिवटी पांच बुधले

शालेय शिक्षकांच्या जीवनावर लिहिलेलें "एक दिवटी आणि पांच बुधले" हें गोपाळ टाकळकर यांचें नवें नाटक गेल्याच महिन्यांत पुण्याच्या रंगभूमीवर सादर करण्यांत आलें. सारेच शिक्षक असलेल्या एका शाळेंत एक शिक्षिका—अर्थात तरुण—येतांच त्यांच्या रोजच्या जीवनांत किती विपरीत घटना घडूं लागतात याचें चित्रण त्यांतून केलेलें आढळेल. शिक्षण हा निव्वळ धंदा मानून त्याचा रतीब टाकणाऱ्या आणि त्यामुळेच त्याचें मूळचें उदात्त स्वरूप बिघडविणाऱ्या शिक्षकांवर लेखकाला कोरडे ओढावयाचे आहेत हें स्पष्ट होतें. या साऱ्या गोष्टी विनोदी घटनांतून दाखविल्या आहेत. परंतु हा सारा विनोद दर्जेदार न राहतां लेखक अश्लील आणि पांचट कोट्या करण्याचे मोहांत पडला आहे आणि त्यामुळेच साऱ्या नाटकाचें यश नष्ट झालें आहे.

एका छोटयाशाच गांवांतील शाळेंत एक स्त्री शिक्षिका म्हणून प्रवेश करते. आणि तिच्याच आगमनामुळे सारे शिक्षक बिथरून जातात. त्या स्त्रीची मर्जी संपादन करून, इतरांवर मात करण्यासाठी धडपडूं लागतात. पी. टी.चे धुरंधर मास्तर, मराठीचे कान्त मास्तर, इंग्रजीचे भोळे मास्तर, आणि संस्कृतचे देव मास्तर या चौघा शिक्षकांनी साधना गोडबोले या शिक्षिकेशी सूत जमविण्यासाठी केलेल्या नानाप्रकारच्या क्लृप्त्या व त्यांचे हास्यास्पद परिणाम या गोष्टी नाटकांत दिसतील.

ही शिक्षिका चारहि शिक्षकांना प्रथम प्रथम नादीं लावते असें वाटतें. त्यांच्याशी गोड गोड बोलते, त्यांना घरीं बोलावते, त्यांना चहा पाजते, पोहे खायला देते, क्वचित चांदण्या रात्रीं त्यांच्यापैकी एकाबरोबर फिरायला जाते तर, दुसऱ्याबरोबर सिनेमाला जाते. स्त्री–सुखाला आंचविलेल्या शिक्षकांना स्वर्ग तुच्छ भासूं लागतो. इतरांपेक्षा ती आपल्यालाच जास्त मानवते या भ्रामक विचाराने ते तिच्याशी अतिरिक्त लगट करूं लागतात. आणि त्याचवेळीं ती त्यांना फटकारते, त्यांना लांबच उभें राहाण्याचा इशारा देऊन वेळींच सावध करते. या तिच्या दुटप्पी वागणुकीचा निर्णय अखेरीपर्यंत लागत नाही. शेवटीं मात्र ती साऱ्या शिक्षकांना घरीं बोलावून आपल्या वागणुकीचा उलगडा करते. त्यांना मोहाला बळी पाडल्याबद्दल त्यांची क्षमा मागते. ती सांगते की, ती एका एफ्. आर. सी. एस डॉक्टरची पत्नी असून आपल्या नवऱ्याशी तिने लावलेल्या एका विचित्र पैजेखातर तिला असें विचित्र वागावें लागतें. नवऱ्याच्या मतें तिचें पूर्वीचें सौंदर्य नष्ट झालेलें असतें, परंतु आपण अद्यापहि आपल्या सौंदर्याने पुरुष जातीवर मोहिनी घालूं शकूं असा तिचा आग्रह असतो आणि या विरुद्ध मतांतूनच एक पैज लागते आणि ती पुरी करून दाखविण्यासाठी ती या छोटयाशा गांवांतील शाळेंत येते आणि मास्तरांना नादीं लावून आपलें म्हणणें सार्थ करते.

वास्तविक जरा वेगळ्या पद्धतीचें असें हें कथानक असलें तरी जें मनांत येईल तें निर्भीडपणें मांडण्याच्या नादांतच लेखकाने अशिष्ट वाटणाऱ्या वाक्यांची रचना केली आहे. अशिष्ट वर्णनें केलीं आहेत. आणि त्याचमुळे नाटकाबद्दल मत एकदम चांगलें होत नाही. आज शिक्षकाच्या व्यवसायाचें मूळ उदात्त रूप दूर जाऊन त्याला बाजारी स्वरूप कसें प्राप्त झालें आहे हें स्पष्ट करण्याचा लेखकाचा प्रयत्न यामुळेच कांहीसा अस्पष्ट राहिला आहे.

स्वत: लेखक याच व्यवसायांत वावरत असल्याने त्यांनी गेल्या अनेक वर्षांत नानातऱ्हेचे शिक्षक जवळून पाहिले आहेत; अनुभवले आहेत. त्यामुळे शिक्षकांचा स्वभाव, त्यांची वागणूक, यासाठी त्यांना कुठे दूर जावयास नको होतें. सारा कांही मालमसाला तयारच! आणि याचमुळे असे शिक्षक आज नाहीतच असेंहि म्हणण्याचें धाडस कुणीं करूं नये! परंतु या साऱ्या गोष्टी त्यांनी फारच स्पष्टपणें मांडल्या आहेत, त्यामुळे नाटकाचें स्वरूप कांहीसें विकृत झालें आहे. आजकालच्या स्त्रियांची केशभूषा, वेषभूषा या गोष्टींवर लेखक स्पष्ट शब्दांत कोरडे ओढतो. स्त्रियांची उत्तान वेषभूषा ही तर त्यांच्या टीकेचा प्रमुख विशेष! मग यासाठी लेखकानें कोणत्या गोष्टीचें वर्णन केलें असेल हें सूज्ञास सांगणें न लगे! वास्तविक या सर्व गोष्टी प्रत्येकाच्या मनांत येत असतातच, पण त्याला नाटयकृतींत किती व कसें स्थान द्यावें हा प्रश्न आहे. लेखक स्वत: कवि असल्याने कित्येक संवाद नवकाव्याचा प्रकर्षाने भास करून देतात. छोटीं छोटीं तुटक वाक्यें हेंच संवादाचें वैशिष्टय! नवकाव्य, नवकथा, यांचा भास अनेक वेळां होतो.

या इनमिन् पांच-सहा पात्री नाटकांत राजा नेने आणि इंदू मुजुमदार या दोन प्रख्यात कलावंतांनी भूमिका केल्या असून अन्य पात्रें

## ७०० प्रयोग !

# ' सेतू ' या बंगाली नाटकाचें आगळें यश



असीमकुमार आणि तृप्तीमित्रा
' सेतू ' मधील एक प्रसंग

मराठी रंगभूमीवर एखाद्या नाटकाचे शंभर प्रयोग झाले तर त्या नाटकाचा, नाटककाराचा व दिग्दर्शक–नटांचा केवढा गौरव करण्यांत येतो ! पण बंगाली रंगभूमीवर शेकडो प्रयोग झालेलीं व होत असलेलीं नाटकें अनेक आहेत, तरीपण बंगाली नट–नाटककारांची प्रयोगशील वृत्ति व नवीन कांहीतरी करण्याची धडपड सतत चालू असते. सध्या विधायक भटाचर्य यांच्या ' सेतू ' या नाटकाचे ७०० वर प्रयोग होऊन गेलेले आहेत. सतत २--२॥ वर्षे कलकत्त्यांतील एकाच थिएटरमध्यें या नाटकाचे अजूनहि तडाखेबंद प्रयोग होत असल्याचें पाहून अचंबा वाटल्यावाचून राहात नाही. आठवड्यांत या नाटकाचे पांच प्रयोग नियमाने होतात. दर गुरुवारीं संध्याकाळीं ६ वाजतां एक, आणि शनिवार–रविवारीं ६ आणि ९ वाजतां दोन दोन प्रयोग होत आहेत. सुट्टीचे दिवशीं दोन प्रयोग जादा असतात. नाटकाचें कथानक एका वांझ स्त्रीच्या जीवनावर आधारित असून मूल न झाल्याने तिच्या मनाची होणारी विकल अवस्था या नाटकांत प्रामुख्याने सांगितलेली आहे. दुसऱ्या पुत्रवती स्त्रिया पाहून तिच्या मनावर वारंवार आघात होत असतात. आणि तिच्या मनाची स्थिति वेड्यासारखी होते. आपल्या नवऱ्याला आपण मूल देऊं शकत नाही त्यामुळे ती आगगाडीखाली जीव देण्यास जाते, परंतु त्याच वेळीं तिचा नवरा तेथे जातो आणि तिला तिच्या विचारापासून परावृत्त करतो.

असें अत्यंत साधें सोपें कथानक आहे. २॥ ते २॥। तासाचें नाटक आहे, पण हे तास कसे जातात हें प्रेक्षकांना कळत नाही. बंगाली न समजणारा प्रेक्षकदेखील रंगमंचावरील दृश्यें पाहून मंत्रमुग्ध होऊन जातो. या नाटकाचें वैशिष्टय म्हणजे त्यामधील–लाईट–ईफेक्टस्–दीपयोजनेचें तंत्र इतकें प्रगत झालें आहे की, रंगभूमीवरील त्याचा आविष्कार पाहून मन थक्क होतें. प्रत्येक गोष्टीमध्ये बंगाली कलाकाराची अभ्यासूवृत्ति वारंवार प्रकट होते. शेवटच्या अंकांत आगगाडीखाली नायिका जीव देण्यास जाते असा प्रसंग आहे. त्यावेळीं एका पुलावरून आगगाडी जात असतें आणि नायिका दरड चढून त्याखाली जीव देण्यास पुढे येते. यावेळीं आगगाडीचा पुलावरून जातांना होणारा आवाज, पुलाचा घडधडाट, दिव्याच्या प्रकाशांत पुलाच्या कमानीच्या पडलेल्या पडछाया आणि आगगाडीच्या पुढे असलेला ' सर्च लाईट या साऱ्या गोष्टी यथातथ्य दाखविण्यांत येतात. रंगभूमीवर साक्षात् गाडी येत आहे असें वाटतें. नायिका आत्महत्त्या करणार यामुळे प्रेक्षकांचें हृदय धडधडूं लागतें. सारे प्रेक्षक खुर्चीला खिळून बसतात. रंगभूमीवर साक्षात् मृत्यु पाहावयास मिळणार म्हणून सारा प्रसंग असह्य होतो. आज मराठी रंगभूमीवर असा एकदा तरी प्रसंग आहे

---

( पान २४ वरून चालू )

नवोदित आहेत. या नाटकामुळे या अन्य नटांना आणि विख्यात नटांना फारशी लोकप्रियता मिळण्याची संधीहि कुठे दिसत नाही. नाटकांत कोणाहि कलावंताने आपले आगळें वैशिष्टय उभें केलेलें नाही. सारे कलावंत अगदीच सामान्य वाटतात. नाहीं म्हणावयास इंदु मुजुमदार याच काय त्या त्यांतल्या त्यांत बऱ्या आहेत. त्यांनी साधना गोडबोले यथातथ्य उभी केली आहे. राजा नेने यांची देव मास्तरांची भूमिका किरकोळ वाटली. भोळे–कृष्णराव टाकळकर, धुरंधर–सुधाकर कळमकर, कान्त–अनिल हवालदार हे अगदीच सामान्य ठरले. विशेषत: हवालदार यांच्या बसक्या आवाजाने तर त्या प्रमुख भूमिकेचा पार विचका केला. आवाज ही नटाची प्रमुख कसोटी आहे हें त्यांच्या लक्षांत नसावें !

असें हें नाटक त्यांतील विनोद अशिष्ट म्हणून वाङ्मयीन दृष्ट्या सामान्य वाटलें तर नटांच्या दुबळया प्रयत्नामुळे ते अधिकच सामान्य झालें. नाटक सामान्य तर नटवर्ग तरी उत्तम हवा किंवा नाटक तरी प्रभावी पाहिजे ! पण या दोनहि गोष्टी येथे दिसल्या नाहींत. नाटकाचा दर्जा कमी प्रतीचा आणि नटवर्ग बेतासबात त्यामुळे सारेंच कांही अगदीच सुमार ! टाकळकरांचें " नकटीच्या लग्नाला " हें नाटक त्यामानाने फारच उत्तम होतें. मग याचवेळी लेखक असा कां घसरला हें कळत नाही.

● ● ●

जुनी रंगभूमि

# धन्य ते मालक !

# धन्य ते नोकर !



श्री. केशवराव शितुत

नटाला अेका कंपनींतून दुसऱ्या कंपनींत पळवून नेल्याच्या कथा आजवर अनेकांनी अनेकवेळा सांगितल्या असतील. परंतु नाटककारालाच अेका प्रख्यात कंपनीच्या धूर्त आणि तत्पर मॅनेजरने पळविल्याची कथा किती जणांना माहीत आहे ? ललितकलादर्श या विख्यात कंपनीच्या इतिहासांत ही गोष्ट घडलेली आहे.

कै. केशवराव भोसले कंपनीचे मालक असतांना १९१७ सालची गोष्ट ! कंपनीचा मुक्काम कारंजाला होता. कंपनी तेव्हा जुन्याच नाटकांचे प्रयोग करीत होती. आणि जरी प्रयोगांना उत्पन्नहि तडाखेबंद होत असलें तरी कांही तरी नवें रुचकर खाद्य प्रेक्षकांना दिल्याखेरीज कांही खरें नाही असें केशवरावांना राहून राहून वाटत होतें. कोणत्या नव्या नाटककाराचें नवें नाटक रंगभूमीवर आणावें याच विवंचनेंत ते असतांनाच त्यांना कोणींतरी श्री. मामासाहेब वरेरकरांचें नांव सुचविलें. त्यांच्याकडे अेक नव्या नाटकाचें कथानक तयार आहे. फक्त त्यांना वेठीला धरून तें लिहून घ्यावें लागेल असेंहि सुचविलें. केशवरावांनी आपले मॅनेजर केशवराव शितूत यांना ही कामगिरी सांगितली आणि मालकांच्या सांगीप्रमाणे वरेरकरांना कंपनींत घेऊन येण्याचा निर्धार करूनच केशवराव शितूत कारंजाहून मुंबईस येऊन दाखल झाले.

परंतु वरेरकरांना हस्तगत करणें ही गोष्ट कांही सोपी नव्हती ! नाटकी जगांत त्यावेळीच वरेरकरांना अेक उत्तम नाटकार म्हणून चांगली मानमान्यता मिळूं लागली होती. अनेक नाटक कंपन्यांचे मालक त्यांच्याकडून नाटक मिळविण्यासाठी झटत होते. केशवराव शितूत यांच्याप्रमाणे जळगांवहून नानबा गोखले हे सुध्दा मुंबईंत येऊन दाखल झाले होते आणि त्यांनी केशवरावांवर मात करून वरेरकरांना हस्तगत केलेंहि होतें. गिरगांवांत आपल्या अेका मित्राकडे वरेरकरांना ठेवून गोखले निर्धास्तपणें झोपले होते. शितूत यांना ही बातमी कुणींतरी सांगितली. ते मनाशी जरा चरकलेच ! पण अेकवार प्रयत्न करून पहावा म्हणून भर दुपारच्या टळटळीत उन्हांत ते गिरगांवांतील शेटचे यांच्या घरीं येऊन दाखल झाले. दारांतच नानबा गोखले गाढ झोपले होते. आणि वरेरकर आंत कांही तरी लिहीत होते. शितूतांनी त्यांना हळूच खूण करून बाहेर बोलावलें आणि त्यांना तसेंच घेऊन व्हिक्टोरियांत घालून थेट लोअर परळला वरेरकरांच्या अेका मित्राच्या घरीं नेऊन ठेवलें.

निर्धास्तपणाचा सुस्कारा टाकून शितूत स्वत: मात्र आपल्या माधवाश्रमांतील मुक्कामावर परत आले. दुपारीं ३च्या सुमारास गोखले जागे झाले तों काय ? वरेरकर दिसेनात ! तास-दिड तास वाट पाहिली आणि मग मात्र त्यांचा धीर सुटला. त्यांनी जेथे जेथे म्हणून शक्यता होती तिथे तिथे जाऊन पाहिलें, पण व्यर्थ ! रात्रीं पावणेदहा वाजतां तर त्यांना वरेरकरांना घेऊन गाडीने जळगांवला जायचें होतें आणि दुसऱ्या दिवशीं तर जळगांवला खेळ ठरलेला होता आणि नानबांची उपस्थिति अत्यावश्यक होती. करणार काय ? गोखले हवालदिल झाले ! पण इतक्यांत त्यांना कुणीं केशवराव शितूतांनी वरेरकरांना व्हिक्टोरियांतून नेल्याचें सांगितलें आणि मग मात्र नानबा गोखले

---

( पान २५ वरून चालू )

का की, प्रेक्षक तो पाहाण्यासाठी पुन्हा पुन्हा जावेत ? त्यांच्या हृदयाचे ठोके बंद पडावेत ? या साऱ्या गोष्टी बंगाली नाटकांतून दिसतात. क्षतगर्वी, फरारी फौज, अंगार या अन्य नाटकांतूनहि अशीच वास्तव दृश्यें दाखविण्यांत त्यांचा हातखंडा आहे.

'तप्पसेन' हा तेथील दीग्दर्शक अत्यंत कुशल आणि अभ्यासूवृत्तीचा असून जाहिरातींत त्याचें नांव पाहून हजारो प्रेक्षक नाटकाला धावत जातात. एका पड्याआड वावरणाऱ्या माणसासाठी अनेक वेळा प्रयोग पाहाण्यास जाणारे प्रेक्षक मराठी प्रांतांत किती आहेत. ?

या ' सेतू ' नाटकांत काम करणारी प्रमुख नटी आहे ' **तृप्ती मित्रा** ' ! आजची बंगालची विख्यात अभिनेत्री !! यंदाचें उत्कृष्ट अभिनयाचें पारितोषिक हिलाच मिळालेलें आहे. गतवर्षी मुंबईमध्ये झालेल्या बंगाली नाटकांतून हिचें दर्शन सर्वांना घडलेंच आहे. तेव्हा साऱ्या टीकाकारांनी तिची अेकमुखाने स्तुति केलेली होती. नाटकाचे लेखक विधायक भट्टाचार्य हेसुध्दा या नाटकांत काम करतात. या खेरीज अन्य १२ नट आणि रंगभूमीमागील व्यवस्थेसाठी ५--७ लोक असा २०--२५ माणसांचा संच या नाटकासाठी कामें करतो.

[ श्री. बाळासाहेब जोशी यांच्या सौजन्याने ]

त्यांच्या डोक्यांत प्रकाश पडला. आणि त्यांनी तडक माधवाश्रमाची वाट धरली. दारांतच तीन-चार दोस्तांबरोबर शितूत मजेंत गप्पा मारीत बसलेले पाहातांच तर त्यांच्या तळपायाची आग मस्तकालाच गेली. आणि ते शितूतांना अद्वातद्वा बोलूं लागले. सारा रस्ता जमा झाला. नानबा गोखले बेफाटासारखे बोलत होते आणि शितूत शांतपणें सारें ऐकत होते. हें ऐकतर्फी वाग्युद्ध पाहून तर कित्येकजण बुचकळ्यांत पडले. कारण शितून तसे महाकोपिष्ट ! कुणाचें फट् म्हणून घेणार नाहीत ! पण यावेळीं मात्र एकाद्या मुखस्तंभासारखे स्वस्थ ! पुष्कळांना याचेंच नवल वाटलें. तास-दीड तास नानबा गोखले ताड्ताड् बोलले, पण अखेरीस शितूत आपल्याला थांगपत्ता लागू देत नाहीत हें पाहून अत्यंत निराशेने ते परत फिरले आणि पूर्वी ठरविल्याप्रमाणे रात्रीच्या गाडीने जळगांवला परत गेले.

शितूत मात्र हा सारा प्रकार मनांतल्यामनांत हसत पहात होते. त्यांना नंतर पुष्कळांनी विचारलें तेव्हा ते म्हणाले, " मी उगीच त्यांच्या तोंडीं कशाला लागू ! माझें काम मीं फत्ते केलें होतें. विनाकारण त्यांच्या प्रश्नांना उत्तरें देऊन मीं माझी शोभा मात्र करून घेतली असती. " दुसऱ्या दिवशीं लोअर परळहून शितूतांनी वरेरकरांना ताब्यांत घेतलें आणि परत कारंजाची वाट धरली.

असे होते हे ललितकलेचे पहिले मॅनेजर ! कंपनीवरील त्यांची प्रीति आणि आपले मालक केशवराव यांच्यावरील भक्ति या दोन्ही गोष्टी यांच्या ठिकाणीं प्रकर्षाने दिसतात. आपल्या मालकांवरील भक्तीमुळे त्यांनी त्यांच्या मृत्यूनंतर–केशवराव भोसले यांच्या मृत्यूनंतर म्हणजे १९२१ नंतर---अेकहि नाटक आजवर पाहिलेलें नाही. केशवरावांसारखा असामान्य नटच रंगभूमीवर झाला नाही असें त्यांचें मत अजूनहि आहे. मालकांवरील केवढी ही जाज्वल्य श्रद्धा ! ज्या माणसाने लहानपणापासून नाट्यसृष्टींत दिवस काढले त्याने एकदम नाट्यसृष्टीला कायमचा रामराम ठोकावा याला केवढें मनोबल लागलें असेल याची कल्पना आजच्या धंदेवाईक जगाला येणें कठीणच आहे. केशवरावांना लांब कोट, उपरणें आणि डोक्याला रुमाल या गोष्टी अत्यंत प्रिय होत्या. त्यासुद्धा शितूतांना त्यांच्या मृत्यूबरोबरच सोडल्या आहेत. धन्य ते मालक आणि धन्य असे व्यवस्थापक !

●●●


शेती व औद्योगिक कामासाठी कार्यक्षम, चालविण्यास अत्यंत सोपी व मजबूत व कौशल्यपूर्ण घडणीची...

● नूतन इंजिन्स ●

सदैव वापरा

* ४ ते ११ हॉ. पॉ. पर्यंतची * कमी फेरे * कोल्ड स्टार्ट * आडवी बांधणी * डबल फ्लायव्हिल *

उत्पादक :– नूतन महाराष्ट्र इंजिनियरिंग कं.
शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर.


## हौशी नाट्य संस्थांना आवाहन

प्रत्येक गांवांत हौशी नाट्यसंस्था रंगभूमीच्या प्रगतीच्या दृष्टीने वाटचाल करीत आहेत. परंतु अशा किती कित्येक संस्था अंधारांतच असतात. त्या गांवापलीकडे त्यांचें नांवहि कोणाला ठाऊक नसतें. अशा संस्थानी कृपया आपले पत्ते आमच्या कार्यालयात कळवावेत. यथाशक्ति त्यांचेशी पत्रव्यवहार करून त्यांच्या संस्थांच्या हालचाली प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस आहे.

—संपादक



" आजच्या रात्रभर हें तुझ्याकडेच ठेव ! घरीं नेलं तर बायको तावडतोब वळकावेल तं.... ! "

# बुद्धिबळाच्या पटावर

**( लेखांक आठवा )**

**श्रीकृष्ण साखळकर**

**पटाचा मध्य ( पुढे चालू )**

प्यादाप्यादी करून आपलीं मोहोरीं लवकर डावांत आणतां येत असतील तर पटाच्या मध्यावर मारामारी करावी, नाहीतर आपल्या मध्यावरील प्याद्याला दुसऱ्या प्याद्याचा जोर करून मध्यावरचा ताबा कायम राखावा हें आपण मागील लेखांत पाहिलें.

पण प्यादाप्यादी करून पटाच्या मध्यावरील आपलीं प्यादीं आपण गमावलीं तरी प्रतिपक्षाच्या मध्यावरील प्याद्यांवर कडक नजर ठेवणें अवश्य असतें व पुढेमागे त्या प्याद्याचा काटा काढणें फायद्याचें ठरतें.

आपण अशा प्याद्यावर नजर कशी ठेवावयाची तें पाहूं. १) प्यारा ४; प्या-रा ४; २ ) घो-राउं ३, घो-वउं ३; ३) प्या-व ४, प्या×प्या; ४ ) घो×प्या, प्या-व ३ काळा पांढऱ्याचें प्यादें जरबेंत ठेवण्यासाठी खेळत आहे. त्याच्या पुढील खेळचा घो-राउं ३, उं-रा २,०-० ह-रा-उं-राउं । ; अशा पडतील व मग पांढऱ्याचें राजाचें प्यादें हल्ल्याखाली राहील. पांढरा याच्या उलट प्या– रा-उं ४, ह-रा, वगैरे खेळून राजाच्या प्याद्याचा जोर वाढवील. हा डाव साधारण पुढे दिलेल्या प्रमाणें खेळला जाईल. १)प्या-रा ४, प्या-रा ४; २) घो-राउं ३, घो-वउं ३; ३) प्या–व ४, प्या×प्या; ४) घो×प्या, प्या-व ३; ५) उं-रा २, घो-राउं ३; ६) घो-वउं ३, उं-रा २; ७) ०-०, ०-० ८) प्या-राउं ४, ह-रा; ९) उं-रा ३, उं-उं; १०) उं-उं ३ उं-व २ आणि दोघाही खेळाडूंचीं मोहोरीं डावांत आलीं आहेत. आता पांढरा प्या-रा ५ खेळण्याचा प्रयत्न करील तर काळा ती खेळी पांढऱ्याला खेळणें अशक्य करण्याचा प्रयत्न करील.

प्यादें नजरेंत ठेवणें ही गोष्ट फार कठीण आहे व तें प्यादें मारून टाकतां आलें तर फार बरें असें वाटतें. पण प्यादें मारून टाकण्याची संधि क्वचितच मिळते. मात्र अशी संधि मिळाल्यावर त्याचा फायदा घेणें योग्य. जसे. :--१) प्या-रा ४, प्या-रा ४; २ ) घो-राउं ३; घो-वउं ३; ३ ) प्या-व ४; प्या×प्या; ४) घो×प्या, घो-राउं ३; ५) घो-वउं ३ उं-रघो ५; ६)घो×घो, घोऱ्या×घो; ७) उं-व ३ प्या-व ४, ८ ) प्या×प्या, प्या×प्या आणि काळ्याला पटाच्या मध्यावर नजर ठेवण्याची जरूरी राहिलेली नाही.

या सर्व विवेचनामधून आणखीन एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होतो. उठसूट डावाच्या सुरुवातीला प्रतिपक्षाचीं प्यादीं खाण्याकडे लक्ष ठेवणें श्रेयस्कर ठरत नाही, कारण त्यामध्यें १ ) खेळचा फुकट जातात २) पटाच्या मध्याकडे दुर्लक्ष होतें. म्हणूनच बऱ्याच डावांमध्ये प्रतिस्पर्ध्याला डावाच्या सुरुवातीला प्याद्याचें आमिष दाखवून अडचणींत पकडण्याचे खेळ खेळले जातात. १) प्या-व ४, प्या-व ४ २ ) प्या-वउं ४ आता जर काळा २ )...प्या×प्या करेल तर क्षणभर तो एक प्यादें जास्त खाईल, पण मग पांढरा घो-राउं ३ व प्या-रा ४ खेळून पटाच्या मध्याचा ताबा घेईल व डावांत मोहोरीं आणातांना काळ्याला त्रास पडेल. तेव्हा सगळ्यांत महत्त्वाचा डावाच्या-सुरुवातीला पटाचा मध्य आहे व त्याकडे दुर्लक्ष करून कोणतीहि खेळी खेळल्यास पश्चात्ताप करण्याची पाळी येईल हें जरूर लक्षांत ठेवलें पाहिजे.

अर्थात पटाच्या मध्यावरील प्रतिपक्षांचें प्यादें खातां आलें तर जरूर खावें. कारण तसें करणें आपल्या मोहोऱ्यांच्या हालचालीला पोषक ठरतें.

पटाच्या मध्याचें विवेचन संपलें. पुढील अंकीं आपण जें दुसरें तत्त्व "रांगेंतील खेळ" याच्याकडे वळूं. पण हा लेख संपवण्यापूर्वी आपण आत्तापर्यंत केलेल्या विवेचनाच्या पुष्टचर्थ एक खेळला गेलेला डाव पाहूं. हा डाव १९११ सालीं निमझोविच ( पांढरा ) आणि आलपिन ( काळा ) हे खेळले. १) प्या-रा ४, प्या-रा ३; २ ) प्या-व ४, प्या-व ४; ३)वघो-उं ३, राघो-उं ३; ४) प्या×प्या, घो×प्या; ५) राघो-उं ३, प्या-वउं ४; ६)घो×घो, व×घो; ७)उं-रा ३, प्या×प्या; ८ ) घो×प्या, प्या-वह ३; ९) उं-रा२, व×राघोऱ्या; १०) उं-उं ३, व-राघो ३; ११) व-व २, प्या-रा ४; १२) ०-०-०, प्या×घो; १३ ) उं×वप्या, वघो- उं ३; १४) उं-उं ६, व×उं; १५) राह-रा। शह, उं-रा २; १६) उं×घो शह. रा-उं; १७ ) ब-व ८ शह, उं×व; १८) ह-रा ८ मात.

●●●

## शुभास्ते पंथान:

'बुद्धिबळाच्या पटावर' या सदराचे 'माणूस'चे लेखक श्री. श्रीकृष्ण साखळकर दि. ३ मे रोजी 'रशियन चेस फेडरेशन' च्या निमंत्रणावरून बुद्धिबळाच्या सामन्यांसाठी रशियास जात आहेत. हे सामने रशियन संघराज्यांतील ताझिकिस्तान राज्यांत दुशांबे या गांवीं खेळले जाणार असून आशियांतील सर्व देशांतून प्रत्येकी एक प्रतिनिधि या स्पर्धेत भाग घेणार आहे. भारताचे प्रतिनिधि करण्याचा बहुमान श्री. साखळकर यांना मिळाल्याबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.



श्री. साखळकर अठ्ठावीस वर्षांचे तरुण खेळाडू असून त्यांची या खेळांतील घोडदौड केवळ दहा वर्षांतील आहे हें विशेष होय. १९५६--५७, ५७--५८ या दोन वर्षांत ते मुंबई विद्यापीठाच्या महाविद्यालयीन स्पर्धेत प्रथमविजेते होते. हाच मान त्यांनी पुणे येथील रानडे चँपियनशिपमध्येहि मिळविला होता. १९६०--६१ मध्ये महाराष्ट्र राज्य विजेतेपद व डिसेंबर ६१ मध्ये हैद्राबाद येथे झालेल्या अ. भा. बुद्धिबळ स्पर्धेत उपजेतेपद ही त्यांची प्रगति अभिमानास्पद नाही असें कोण म्हणेल ?

—संपादक

# पो त डी

रमेश के. सहस्रबुद्धे

## अजब भूतदया

अजब भूतदयेच्या बाबतींत भारतांतील जैन लोक फार प्रसिद्ध आहेत. व्यापारानिमित्त कलकत्त्यास स्थायिक झालेले अनेक जैन व्यापारी पूर्वी ढेकणांना भोजन घालीत असत हें ऐकून तुम्हांला आश्चर्य वाटेल, पण ही सत्यस्थिती आहे. हल्ली मात्र असा व्यापारी शोधून काढणें दुर्मिळ झालेलें आहे.

सुस्थितींतल्या या जैन अगर मारवाडी व्यापाऱ्यांच्या घरांत ढेकणांची एक वेगळी खाट असे. घरांत सापडलेले सर्व ढेकूण न मारतां त्यांना मोठ्या प्रेमानें या खाटेवर आणून त्यांची इच्छा पुरविली जाई! या ढेकणांच्या कुटुंबियांच्या पोटाची व्यवस्था करणें साहजिकपणेंच या व्यापाऱ्यांवर पडे. ढेकणांचें खाद्य म्हणजे रक्त. आणि तें त्यांना पुरविण्यासाठीं पैसे देऊन कांही गरीब माणसें धरून आणलीं जात. या माणसांनी अंगावरील कपडे काढून त्या खाटेवर कांही वेळपर्यंत पडून ढेकणांना रक्तदान करावयाचें. याबद्दल या जैन व्यापाऱ्यांकडून या गरिबांना पैसे मिळत असत.

ढेकणांच्या खाटेवर उघडा होऊन मनुष्य त्यावर किती काळपर्यंत राहूं शकतो यावर त्याला पैसे देण्यांत येत. कांही लोकांचा त्याकाळीं ढेकणांच्या खाटेवर झोपणें हा एक धंदाच होऊन बसला होता. हे लोक गावांतून "खटमल को खिलाव !" असें ओरडत फिरत असत. गरजवंत त्यांना बोलावून आपल्या घरांतील ढेकणांना त्यांचें रक्त खाऊं घालत व त्याबद्दल ढेकणांना खिलविणाऱ्या या माणसांना पैसा मिळे.

●●●

## चमत्कारिक स्वागत

ब्राझीलमध्ये राहणारे टुपिनाबा इंडियन्स या जातीचे लोक आलेल्या पाहुण्यांचें स्वागत रडून करीत असत. ही जात आतां संपुष्टांत आली आहे. घरांत पाहुणा आला कीं, घरांतील सर्व स्त्रिया त्या पाहुण्याभोवती गोळा होऊन मोठ्याने गळा काढून रडण्यास सुरुवात करीत. रडतांना त्या बायका आलेल्या पाहुण्यांची अगर पक्षांचीं नावें उच्चारीत.

ही रडारड चालू झाल्यावर आलेल्या पाहुण्यालादेखील त्यांत भाग घ्यावा लागे. बायकांचें रडें आवरते न आवरतें तोंच पुरुषमंडळी बाहेर येऊन याच प्रकारे पाहुण्यांचें स्वागत करीत. जास्त जवळचा पाहुणा असला म्हणजे ही रडारड मोठ्या प्रमाणांत होई. या उलट दूरचे संबंध असलेल्या पाहुण्यांचे स्वागतार्थ होणारा हा रडारडीचा कार्यक्रम लवकरच आटोपता घेतला जाई.

●●●

## विनोदी गप्पा

आणि बरं का कविराज एका नवकवीला तपासल्यावर डॉक्टर म्हणाले. "डोक्याला ज्यामुळे थोडासाहि ताण पडेल अशी गोष्ट तुम्ही करतां कामा नये. काय ? लक्षांत आलें ना ?"

"म्हणजे ?" खिन्नपणें नवकवि म्हणाला, "यापुढे मीं कविता करावयाच्या नाहीत असंच तुम्हांला म्हणायचंय् ना ?"

"छे ऽऽ छे, अहो भलतंच काय बोलतां" मोठ्याने हंसत डॉक्टर म्हणाले. "कवित वाटेल तेवढ्या करा"

●

कुत्र्याला फार घाबरणारे गोविंदराव साहेबांच्या बंगल्यांत शिरताक्षणीच साहेबांचा कुत्रा जोराजोराने भुंकूं लागला. कुत्र्याचा आवाज ऐकताक्षणीच गोविंदरावांच्या पोटांत भीतीचा गोळाच उठला.

ही गोविंदरावांची चलबिचल जवळच उभ्या असलेल्या त्या साहेबांच्या लक्षांत आली. आणि ते म्हणाले, "मिस्टर गोविंदराव, आपण फारच घाबरलेले दिसतां ? पण घाबरण्याचें अगदीच कारण नाही. तुम्हांला माहीत आहे ना की, भुंकणारा कुत्रा चावत नाही म्हणून."

"हें मला माहीत आहे हो" घाबरलेले गोविंदराव कसेबसे उद्गारले, "पण प्रश्न एवढाच आहे की, हें तत्त्व तुमच्या कुत्र्याला माहीत आहे ना ?"

●

गोपाळला नाही त्या ठिकाणीं भलतंच बोलण्याची घाणेरडी सवय होती. आपल्या मित्राने दिलेल्या लग्नाच्या पार्टीला तो गेला होता. पार्टीच्या वेळेस आपल्या शेजारीच बसलेल्या तरुणीला तो म्हणाला, "माफ करा हं ? पण ती समोर बसलेली खप्पड आणि बावळट चेहऱ्याची तरुणी कोण आहे हो ?"

"काय म्हणालांत ? लाज नाही वाटत असं बरळायला !" ती तरुणी संतापाने म्हणाली, "समोर बसलेली ती तरुणी कोण आहे हें जाणून घ्यावयाचें आहे ना ? माझी बहीण आहे ती !"

"हं ! बरोबर आहे तें !" गोपाळ जीभ चावत म्हणाला, "तुमच्या दोघींच्या चेहऱ्यांतील साम्य इतका वेळ माझ्या कसें लक्षांत आलें नाही बुवा !"

●●●

## नवीन व्याख्या

राजकारण :– मतें बदलणें, आश्वासनें विसरणें आणि तत्त्वच्युतीला तत्त्वज्ञानाची झिलई चढविणें याचें नांव.

सौंदर्य :– सतत गमावीत असूनहि गमावित असल्याचें स्त्रियांना चुकूनसुद्धा वाटत नाही तें.

नवरा :– आपल्या मनासारखें फारच थोडें बोलण्याची संधि मिळणारा दुबळा जीव.

आकडेशास्त्रज्ञ–निराधार गोष्टी गृहीत धरून पूर्वसंकल्पित सिद्धांत बेधडकपणें ठोकून देणारा धाडसी वीर.

वय :– स्त्रियांचे बाबतींत कलानुसार कमी कमी होत जातें तें.


●●●



" लग्न झाल्यापासून म्हणतोय्. एकदा नान्याकडे महिनाभर चैनीत राहायचं ! त्याला झालीं आतां दहा वर्षे ! आज योग येतोय् !........ "

# मे महिना आपणास कसा जाईल?


ज्योतिपाचार्य डॉ. शरद् अभ्यंकर




सगळी भांडीं भरून झालीं. आणखी १॥ मिनिट नळ आहे. तोंपर्यंत...... !




" हें पहा ! तुला माझ्याकरितां स्वेटर विणायचा असला तर आत्ताच सुरुवात कर ! "



" मूर्खा ! ५ काउंट जवळ असतांना ६ स्पेडपर्यंत कॉल वाढवतोस ? तूं स्वतःला कोण भारताचा अर्थ-मंत्री समजतोस काय ? "



# नवें वाचन

## मराठी शायरी

लेखक व प्रकाशक : वा. वा. पाटणकर वकील, यवतमाळ. पृष्ठें ५५, मूल्य दोन रुपये.

उर्दू शायरीचा अभ्यास करून, तिच्यांतील सौंदर्य, नखरेलपणा प्रेमपूजकता इत्यादि गुणांवर लुब्ध होऊन त्या ढंगाचा काव्य-प्रवाह मराठी काव्यसरितेंत आणून सोडण्याचा हा प्रयत्न आहे. अर्थात् हा कांही पहिला प्रयत्न आहे असें म्हणतां येणार नाही. कै. माधव ज्यूलियन यांनी एकप्रकारच्या जिद्दीनें या मार्गावर पाऊल टाकलेंच होतें.

प्रश्न एवढाच की, ही उर्दू ठेवण मराठीच्या ठेवणीला जुळणारी आहे का ? कारण कै. माधव ज्यूलियनांनीहि पूर्ण विचारांतीं तसलें लेखन सोडून दिलें. उत्तानता, अतिशयोक्ति आणि भावनात्मकतेपेक्षा बुद्धितत्त्वावर भर हे विशेष आधुनिक मराठी अभिरुचीला मानवणारे नाहीत. तेव्हा हें उर्दू ढंगाचें कलम कितपत मूळ धरतें यावद्दल शंकाच वाटते. कालन्यायाधीशच योग्य तो न्याय देईल !

तथापि पुस्तक चाळत असतां कांही चांगल्या ओळींनी लक्ष वेधून घेतलें. त्यांचा मासला पहा—

रसराज शृंगाराचा हा धीट आविष्कार पाहा.
‘ अपुल्याच दांतीं ओठ अपुला चावणें नाहीं वरें ’
हक्क अमुचा अमुच्या समोरीं मारणें नाहीं वरें.
व्यतिरेक अलंकाराचें हें एक रम्य उदाहरण—
‘ उपमा तुझ्या वदनास त्याची मीहि दिली असती सुखें
थोडें जरी चंद्रास येतें लाजतां तुजसारखें !

पण बऱ्याच ठिकाणीं भावविवशता, विकारवशता यांचेंच दर्शन आढळतें.

जीवनदर्शन घडविण्याचा प्रयत्न कवींनी केलेला आहे, कांही ओळी अशा.

तोच जगला, ज्याने खरोखर जिंकिलें या जीवना
शेवटीं उरला न कोणी ज्यास प्रिय मृत्यूविणा
‘ हांसतो वरतून नुसती विकलता लपवावया
आळवीतो मांड जेव्हा डोक्यांत माझ्या जोगिया

निवृत्तिवादाचा धिक्कार समजूं शकतो, पण प्रवृत्तिवादाचा अंगीकार केलेला आढळत नाही.

मात्र शायरींतील आर्तता केवळ मोहविणारी आहे. ही आर्तता पाहा.

कफन माझें दूर करुनी, पाहिलें मीं बाजूला
एकही आसू कुणाच्या डोळ्यांत ना मीं पाहिला
बघुनि हे माझेच आंसू धांवले गालांवरी
जन्मभर हासूनही मी रडलों असा मेल्यावरी

विनोदाचे कांहीं मासले पहा—

होणार होतों मुक्त अगदी, नव्हती मला कसली तमा
हाय पण ही आड आली, अर्धांगिची वटपौर्णिमा !’

मात्र सदभिरुचीची मर्यादा अनेकदा ओलांडली गेली आहे. उर्दूच्या दृष्टीने तें ठीक असेलहि, पण मराठीला मानवणारें खास नव्हे.

असो. तरी पण आम्ही या धाडसी प्रयत्नाचें कौतुक करतों. प्रा. क्षीरसागरांची विवेचक प्रस्तावना या मराठी शायरीला मोल आणून देण्यास सरसावली आहे.

पण शेवटीं असेच म्हणावेसें वाटतें की, उर्दू ढंगाची शायरी उर्दूतूनच वाचलेली वरी !

**श्रीराम आठवले.**


## कणसांत पिकलीं मोत्यें

पं. महादेवशास्त्री जोशी, पानें ७४, किंमत रु. १–२५.

सुमारे पन्नास वर्षांपूर्वी हरिभाऊ आपटे यांच्या स्फुटगोष्टींनी तत्कालीन बालवाचकांना गुंगविलें होतें.त्यानंतर अलीकडील वीस वर्षांत स्वर्गीय सानेगुरुजींच्या बालबोध नि रसाल गोड गोष्टी या मालेने बालमंडळींस वेडें केलें होतें. प्रौढ वाचकांनाहि त्या गोष्टी वाचल्याशिवाय राहावत नसे. त्या काळापासूनच पं. महादेवशास्त्री जोशी लिहूं लागले व त्यांच्या बहुविध कथांना गेल्या दीड तपांत आबालवृद्ध वाचकांकडून मान्यता मिळाली आहे.

प्रस्तुत **कणसांत पिकलीं मोत्यें** हा कथासंग्रह वेगळ्या हेतूने वळणाने लिहिलेल्या कथांचा आहे. तो निव्वळ बालांकरतांच अवतीर्ण झाला आहे आणि अशाच आणखी नऊ संग्रहांची तो वानगी आहे. हा संग्रह व येते संग्रह मिळून ‘ जनपदकथा ’ ही माला गुंफण्याचा विचार त्यांनी प्रकट केला आहे. यांतील कथानकांची वेधकता, सजावटीचा आटोपशीरपणा, भाषेची साधी सोपी रसमयता यांमुळे प्रत्येक बालवाचक आगामी संग्रहांकडे डोळे लावून बसेल. सर्व प्रौढांनाही याच्या वाचनाने निर्भेळ आनंद वाटेल. आणि चालू शतकारंभींच्या स्फुट गोष्टींची व वीस वर्षांपूर्वीच्या गोडगोष्टींची खात्रीने आठवण होईल.

**एक ग्रंथपाल**



## ‘ मुलांचा शाम ’ च्या निमित्ताने लहान मुलांच्या मासिकांविषयीं थोडेंसें

स्वातंत्र्य मिळाल्यापासून ज्या नवीन चळवळी आपल्या देशांत निघाल्या त्यांत लहान मुलांचा विकास करण्याची चळवळ प्रामुख्याने आढळेल. त्यांच्या विकासासाठी शाळा आणि घर दोन्ही ठिकाणीं प्रयत्न चालू आहेत. त्यांचें रंजन करतां करतांच त्यांना ज्ञानी, सुसंस्कृत बनविण्याचें कार्य फार मोठें आहे आणि थोडचा विचारांतीं असें वाटतें की, मुलांसाठी जीं मासिकें आपल्याकडे उपलब्ध आहेत त्यांनी या चळवळीचें सूत्रधार बनावें.

बालविश्वांत सहज डोकावल्यास आपल्याला आढळून येईल की, हल्लींच्या सर्वसाधारण मुलाची वा मुलीची बौद्धिक भूक ही मागील पिढीपेक्षा निश्चित् वाढली आहे. सिंदबादच्या सफरीपेक्षा गागारीनचीं सफर त्यांना अधिक आकर्षित करते. कारणही सरळ आहे. बाहेरच्या देशांशी दळणवळण जास्त वाढल्याने, त्यांच्या प्रगतीबद्दल, त्यांनी लावलेल्या शोधांबद्दल, त्यांच्या उपक्रमांबद्दल ऐकायला, वाचायला मिळावें यासाठी आपण उत्सुक आहोंत आणि म्हणूनच सिंदबादच्या अद्भुत सफरीपेक्षा गागारीनची वास्तववादी सफर आपल्या मुलांना परिणामकारक वाटते. नवीन ज्ञान देते, जाणीव देते की, आपण प्रगत होत आहोंत.

या प्रगतीच्या मार्गावर आक्रमण करतांना आपल्याकडील समाज थोडासा गोंधळलेला दिसतो. जुनं सोडवत नाही आणि नवं धरवत नाही अशी सर्वांची स्थिति झाली आहे. अशा परिस्थितींत जुन्यानव्यांतील चांगलें ओळखून बरोबर त्याचें ज्ञान मुलांना करून देण्यास कांहीच हरकत नाहीं. लहानपणापासूनच त्यांच्यावर अशा तऱ्हेचे संस्कार पद्धतशीरपणें व्हावेत.

परंतु मराठी बालमासिकांच्या दालनाकडे वळल्यास अत्यंत निराशा पदरीं येते. रंजन करून, सोप्या, सुलभ तऱ्हेने मुलांच्या गळीं विश्वबंधुत्व, सांघिक वृत्ति, खिलाडूपणा, निरागसता आणि ज्ञान एवढया गोष्टी उतरवायच्या आहेत. त्या दृष्टीने मराठींत बालमासिकांना फार मोठें क्षेत्र आहे. परंतु सध्या चालू असलेल्या आणि नुकत्याच नव्याने सुरू झालेल्या एका पक्षिकांतूनहि याचा पुष्कळसा अभाव आढळतो, “आनंद” सारख्या मासिकाच्या मागे पन्नास वर्षांहून अधिक काळची तपश्चर्या आहे; ज्ञान देण्याची प्रवृत्ति आहे, परंतु तें आकर्षकपणें मांडण्याची तयारी नाही. त्यांतील मोठ्या लोकांच्या छोटचा गोष्टी, देशविदेश हीं सदरें वाचकांना कांही नवीन ज्ञान देतात. परंतु इतर भागांत जुनेपणा फार आढळतो. त्यांनी आकर्षक चित्रांची जोड द्यावी, चांगला कागद वापरावा, नव्या नव्या स्पर्धा सुरू करून वाचकांना खराखुरा आनंद द्यावा. असें झाल्यास “आनंदांतून” मुलांना खूप प्रेरणा मिळण्यासारखी आहे. जी गोष्ट आनंदाची, तीच थोडयाफार फरकाने शालापत्रकाची आहे. वयाने, अनुभवाने वडील असलेल्या या मासिकांनी आपलें जुनें स्वरूप पूर्णपणें बदलून टाकून नवा साज चढवला पाहिजे. असें न झाल्यास, पोकळ डामडौल असलेल्या, पानोपानीं रंगीत चित्रें विखुरलेल्या चांदोबापाठीमागे सर्वच्या सर्व मुलें वळतील. त्याच त्याच गोष्टी वेगळीं नांवें देऊन मुलांपुढे ठेवणें एवढेंच कांही बालमासिकाचें काम नाही. कोणतेंहि मासिक वाचून मुलांना कांही नवीन ज्ञान मिळालें पाहिजे, त्यांच्या मनावर खोलवर संस्कार झाले पाहिजेत, कांही नवीन करण्याची धडपड त्याच्या अंगीं निर्माण झाली पाहिजे.

आपल्या घरच्या वडील मंडळींकडून रामायण महाभारत एकून आपण आपली संस्कृति बनवली, परंतु हल्लींच्या काळी घरांत कोणाला दिवसच्या दिवस गोष्टी सांगायला वेळ होणार नाही. मग मुलांवर संस्कार करण्याचें काम ह्या मासिकांनी कां करूं नये ? अर्थात संस्कार घडवायचे म्हणजे त्यासंबंधीचे पाठ एकापुढे एक ठेवून द्यायचे असें नव्हे. 'गोकुळ'च्या अंकांतून अशा तऱ्हेची जंत्री आपल्याला आढळते. पूर्वीच्या पंतोजीची भूमिका 'गोकुळ' करत आहे. मुलांना नाही आवडणार असला हा पंतोजी “ चला, मी तुम्हांला नीतीचे चार पाठ देतों ” असें रुक्षपणें सांगून कां मुलें जवळ येणार आहेत ? रंजनाद्वारे त्यांना सर्व तऱ्हेचे, सर्व शाखांचें ज्ञान द्यायला हवें. त्यासाठी चांगला स्वच्छ कागद हवा, चांगली छपाई हवी, भरपूर चित्रें हवींत, नव्या नव्या स्पर्धा हव्यात, तरच त्यांनी खरें कार्य केल्यासारखें होईल. चांगल्या गोष्टींची त्यांना संवय लागली कीं, तींहि नीटनेटकेपणा, टापटीप, स्वच्छता आपोआप शिकतील. “कावळ्याचं घर होतं शेणाचं अन् चिमणीचं घर होतं मेणाचं ” या गोष्टींत कावळ्याला आपण नांवं ठेवतों, आळशी म्हणतों. मुलांना तसंच सांगतों. गोष्टींतील चिमणी मुलांना आवडते. कारण ती स्वच्छता, टापटिपीची भोक्ती आहे. म्हणूनच हल्लीच्या बालमासिकांनी ठरवावें की, ते कावळ्याप्रमाणे स्वतःची फजिती करून घेणार का चिमणीप्रमाणे शाबासकी मिळवणार ?

### नीटनेटका ‘ कुमार ’

नीटनेटकेपणा ही जर कसोटी धरली तर “ कुमार ” मुलांना खूप आवडतो. त्यांत साहित्यहि भरपूर असतें, परंतु त्याचें मुखपृष्ठ कांही तितकेंसें आकर्षक वाटत नाही. शिवाय वर सांगितलेल्या मासिकांप्रमाणेच कुमारमार्फतहि बालांना प्रेरणा देण्याचें कार्य कितपत चालतें हा विचार करण्यासारखा भाग आहे. हल्लीचा मुलगा सर्व तऱ्हेच्या ज्ञानशाखांतून हिंडायला उत्सुक आहे. लेखकांचें कामच रंजकतेने सांगण्याचें आहे. चपळ विद्युल्लतेप्रमाणे हल्लीच्या मुलांची बुद्धि चौफेर, नव्याचा मागोवा घेत हिंडत आहे. त्या बुद्धीला शिस्त लावून शक्ति बनविण्याचें काम आपलें आहे.

अर्थात बुद्धिमान् म्हटलें तरीहि तें मूलच आहे. त्याला झेपेल असेंच ज्ञान दिलें पाहिजे. नव्यानेच सुरू झालेल्या “ मुलांचा श्याम ” या पाक्षिकांत सुरुवातीलाच एक लेख आहे. लेख विस्तृत असून एका प्रसिद्ध विद्यमान् प्रोफेसरांनी लिहिलेला आहे, परंतु सुरुवातीपासून शेवटपर्यंत मुलांना त्यांत कोठेंहि नवीन ज्ञान मिळाल्याचा आनंद होणार नाही. कारण जें सांगण्याचा लेखकाचा विचार आहे तें मुलांना सहज पेलवण्यासारखें नाही.

"मुलांचा श्याम" या पाक्षिकांतून बाकीचे आदर्श मात्र पाळलेले आहेत. स्वच्छ कागद, चांगली छपाई, चित्रें, कोडीं, हस्तकला, चित्रकलाविषयक लेख, नित्यपरिचयाच्या विषयांची शास्त्रीय माहिती यांनी हा अंक सजला आहे. अंकांत विविधता खूप आहे. चालकांनी चालू घडामोडींविषयी, नवीन शोधांविषयी रंजक माहिती जरूर द्यावी. त्यांतील सल्लागार मंडळावरील कवींनी मुलांच्या तोंडीं सहज घोळतील अशा नव्या नव्या कविता रचाव्यात. चित्रकारांनी उत्कृष्ट चित्रांचा ( जमल्यास एकादें रंगीत ) साज चढवावा आणि आपलें स्वरूप अधिक विशाल, व्यापक बनवावें.

अर्थात वरील सूचना करण्याचा हेतु हाच की, या सर्व मासिकांतून आशेला जागा आहे. पूर्णपणें निराशा करतात तीं म्हणजे साप्ताहिकांतून किंवा मोठ्या मासिकांतून बालांसाठी जीं सदरें चालतात तीं ! एकादी कविता नाहीतर एकादी अनुवादित गोष्ट म्हणजे कांहीं बालांसाठी सदर चालविणें नव्हे. लहान मुलांनी असा टाहो थोडाच फोडला आहे की, प्रत्येक मासिकांनी, पाक्षिकाने आमच्यासाठी कांही केलें पाहिजे ! हट्ट आहे तो अशा तऱ्हेच्या स्त्री, लोकसत्ता, सकाळ, साधना, तरुणभारतच्या चालकांचा.

ज्यांना खरोखरीच अशी तळमळ असेल की, आपण आपल्या पुढच्या पिढीला सर्व क्षेत्रांत मार्गदर्शन करावें, त्यांनी एकत्र येऊन जरूर या गोष्टीचा विचार करावा, कांही मूलभूत नियम ठरवावे आणि त्यांचें पोषण मुलांसाठी चाललेल्या मासिकांतून कसें करतां येईल हें पाहावें.

●●● एक भगिनी.

## साभार पोच

**अपंगत्वावर विजय.** लेखिका: उषा मोहनी. किं. रु. २ न. पै. ६०. पृष्ठें १३९

**भारतीय शेती,** लेखक: स. ह. देशपांडे. किं. रु. २. न. पै. ६०. पृष्ठें १५५.

प्रकाशक: समाज प्रबोधन संस्था. विद्यापीठ वाडा, १२४२ सदाशिव पुणें २.

**कथाकुंज:** लेखक: स. कृ. जोशी. प्रकाशक, बाबुभाई लाखाणी. लाखाणी बुकडेपो, मुंबई नं. ४, किं. रु. ३, पृष्ठें १४३.

**भाववीणा:** संपादक व प्रकाशक : वसंत पवार. चेतना प्रकाशन. ४० ब्लॅंड नाका, पंढरपूर. किं. ५० न. पै. पृष्ठें ४७.

**न उलगडलेलं कोडं :** लेखक : रामचंद्र हिंगणे, प्रकाशक : मधुकर बाबुराव राऊत, नलिनी साहित्य प्रकाशन, ३१ गुरुवार पेठ, पुणें २. किं. रु. २, पृष्ठें ७८.

**मुक्तद्वार :** लेखक : स. वि. लिमये. प्रकाशक : तुळशिराम देवराम त्रिवेदी. गुजरात लॉज, मोदी नं. ३, सिताबर्डी नागपूर. किं. रु. १ न. पै. ५०, पृष्ठें ७२.

**ओळख :** लेखक : दत्तो वामन पोतदार. प्रकाशक, व्हीनस बुक स्टॉल, अप्पा बळवंत चौक, पुणें २. किं. रु. ३-०० पृष्ठें १०७.

**सम्राट अकबर :** लेखक व प्रकाशक : सय्यद अहमद अमीन, सांगली, किं. रु. ४-०० पृष्ठें २२७.

**दाणे आणि खडे :** लेखक : श्री. वा. भावे, प्रकाशक : व्हीनस प्रकाशन, पुणें २. किं. रु. २-५० न. पैसे. पृष्ठें. ★


तारेचा पत्ता :—वारणासाकर कोल्हापूर ] — जय सहकार — [ फोन नं. कोल्हापूर ४६

व्यापारी चांगलें काय तें जाणतात ! शुभ्र, दाणेदार म्हणून लोकप्रिय ठरविलेली 'वारणा साखरच' व्यापारी पसंत करतात ! आपल्याला साखर खरेदी करायची असेल तर आम्हांला निःसंकोचपणें भेटा आणि सहकार्याची संधि द्या ! सरकारी नियंत्रणामुळे दर महिन्याला साखरेचा ठराविक साठाच विक्रीसाठी खुला होत असल्याने व्यापाऱ्यांनी त्वरा करावी ! शुभ्र, दाणेदार व लोकप्रिय साखरेसाठी भेटा अगर लिहा...

श्री वारणा सहकारी साखर कारखाना लि.

वारणानगर, जिल्हा कोल्हापूर

— इन्चार्ज मॅनेजिंग डायरेक्टर —
श्री. नंदकुमार के. नाईक.
बी. कॉम्.

— चेअरमन —
श्री. वि. आ. कोरे.

# मेणा ... ... ... ... ब. मो. पु.

इंग्रजांचा एक वकील पुण्यास पेशव्यांच्या दरबारांत असावा असें एक तहान्वयें ठरलें आणि त्याप्रमाणे इंग्रज वकील पुण्यास आला. त्याला रहाण्याकरितां बेटांत जागा देण्यांत आली. हें " बेट " म्हणजे, मुळा आणि मुठा ह्या नद्यांच्या संगमावर नैऋत्य कोनांत असलेली जागा. तेथे एक बंगला बांधून साहेबाचा वकील राहूं लागला. वकील फार हुशार होता. त्याचें नांव मॅलेट.

इंग्रज वकीलाने मुंबईहून खाद्यपदार्थ, पुस्तकें किंवा कपडेलत्ते आणावयास पुणे दरबारची आडकाठी नव्हती. परंतु शस्त्रास्त्रें किंवा दारूगोळा या सारख्या वस्तू मात्र त्यांनी आणतां कामा नयेत, अशी अट पुणें दरबारने त्यांना घातलेली होती.


हा इंग्रज वकील कामकाज असलें म्हणजे शहरांत येत असे. पेशव्यांचा दरबार असला म्हणजे दरबारासहि येत असे. नाना फडणविसांचें त्याच्या हालचालीवर बारीक लक्ष असे. कांही झालें तरी जातीचा इंग्रजच तो. कांही ना कांही गुप्त कारस्थानें करील, कुठं कुणाशी संधान बांधील ही शंका आणि भीति नानांना सतत असे. हा मॅलेटसाहेब भारी गोडबोल्या होता. लोकांवर छाप टाकून आपल्या नादी लावण्याचं कसब त्याच्या अंगीं पुरेपूर होतं. त्यामुळें नानांना फारच काळजीने लक्ष ठेवावं लागत होतं.

मुंबईहून मॅलेटकरितां नेहमी कांही ना कांही वस्तु, फळफळावळ, कापडचोपड वगैरे येत असे. मुंबईच्या ईस्ट इंडीया कंपनीच्या मुख्य कचेरींतून हा माल मॅलेटला येत असे. असें बरेच दिवस चालू होतें. मॅलेट आता पुण्यांत रुळला होता. बरेच दिवस मुंबईची ही आवक-जावक निर्वेधपणें चाललेली पाहून मॅलेटच्या मनांत कल्पना आली की, आपण जर एखाद्या दिवशीं मुंबईहून उत्तम उत्तम बंदुका मागविल्या तर ? काय होईल ? अन् त्याला वाटलें की, इतर वस्तू जशा बिनबोभाट आपल्यापर्यंत येऊन पोहचतात, तशा त्या बंदुकाहि येऊन पोहोचतील ! पुणे दरबारांतल्या कांही सरदारांना " सप्रेम भेटी " दाखल गुपचूप देऊन त्या सरदारांचं प्रेम मिळवायला त्या उत्कृष्ट बंदुका अचूक उपयोगी पडतील ! आणि मॅलेटसाहेबाने गुपचूप खास गुप्त निरोप मुंबईला पाठविला, " मेण्यांत घालून बंदुका पाठवा ! "

एके दिवशीं पंधरा-सोळा मेणे मुंबईहून निघाले. कांहींत सामान सुमान, कांहींत पैसा अडका, कांहींत पुस्तकें, कांहींत माणसें अन् एकांत बंदुका ! अगदी बिनबोभाट ! गुपचूप ! मेणे निघाले. पुण्याच्या मार्गाला लागले.

आणि शनिवारवाड्यांत नानांच्या गुप्त हेराने ही बातमी आणली ! अगदी एकांतांत हेराने नानांना सांगितलें की, अमुक अमुक रंगाच्या व आकाराच्या मेण्यांत बंदुका आहेत ! ताबडतोब नानांनी पुण्याहून स्वार पिटाळले आणि नेमका " तोच " फक्त मेणा लोणावळ्याच्या घाटांत पकडून लौकरांत लौकर पुण्याला थेट शनिवारवाड्यांत आणून दाखल करण्याचा हुकूम नानांनी त्या स्वारांना दिला. स्वार दौडत सुटले.

मेणे घाट चढून आले. मेण्यांत असलेल्या इंग्रजांना वाटत होतं की, आपल्याला " जमलं, " " साधलं, " " पचलं " ! चोरट्या आनंदांत



गोऱ्या तोंडावरचे घारे डोळे चमकत होते, घाटमाथ्यावरची थंड वाऱ्याची झुळूक त्यांना सुखवीत होती. एवढ्यांत मराठ्यांची चौकी आली. नेहमीप्रमाणे मामुली चौकशी होऊन मेणे पुढे सटकणार हें इंग्रजांना माहीत होतें, पण ह्या वेळीं ?

एकदम पांच पंचवीस मराठी स्वार पुढे आले ! त्यांनी विचारलें, " काय आहे मेण्यांत ? "

साहेबांनी सांगितलें, " कांही नाही ! नेहमीसारखेंच आमचें सामान-सुमान आहे ! "

" ठीक आहे ! ह्यापैकी तो सातवा मेणा जप्त करून आणण्याचा आम्हाला श्रीमंतांचा हुकुम आहे ! "

स्वारांच्या म्होरक्याने हुकुमाचा कागद दाखविला. साहेबांचे डोळे गरगर फिरूं लागले ! अंगाला घाम सुटला ! स्वारांनी नेमका 'तो' मेणा बाहेर काढला ! आणि बाकीचे मेणे तासभर चौकीवर थांबवून ठेवून 'तो' मेणा झपाट्याने पुण्याकडे पिटाळला. लौकरच 'तो' खासा मेणा शनिवारवाड्यांत येऊन दाखल झाला. नानांनी तो बघितला आणि त्यांनी ताबडतोब बेटांत साहेबाला निरोप पाठविला की, तातडीचा दरबार आहे ! ताबडतोब या !

इंग्रज वकील लगेच ह्या तातडीच्या दरबारास निघाला. त्याला कांहीहि कल्पना नव्हती. तो शनिवारवाड्यांत येऊन दाखल झाला. वाड्यांत दरबाराची कांहीच गडबड नव्हती. तो दरबारच्या महालाकडे निघाला.

आणि तो दरबारांत प्रवेशला. आश्चर्याचा जबरदस्त धक्का बसला त्याला ! सबंध दरबारांत फक्त दोनच माणसें होतीं ! एक श्रीमंत सवाई माधवराव आणि दुसरे नाना फडणीस ! श्रीमंत आपल्या मसनदीवर बसले होते आणि नाना उजव्या बाजूला उभे होते. अन् दरबारांत प्रत्येक लोडाशी एकेक बंदुक उभी करून ठेवलेली होती ! साहेबाने हें दृश्य पाहिलें. नाना करड्या नजरेने त्याच्याकडे पाहात होते. नानांच्या नजरेस नजर देण्याचें धारिष्ट साहेबाला होईना. तो मनांत काय समजायचं तें समजला होता. पुन्हा अशा प्रकारें नियमभंग आम्ही करणार नाही. एक वेळ माफी असावी, असें म्हणून इंग्रज वकील मान खाली घालून निघून गेला. ★

एस्. वाय्. जोशी, पुणे

# कांही सुलभ निसर्गोपचार

निसर्गोपचाराने रोग बरे करण्याचें कार्य गेलीं ८–१० वर्षें मी करीत आहें. हवा, सूर्यप्रकाश, आसनें, आहारांत बदल व मालीश यांनीच बहुतेक रोग बरे होतात असा माझा अनुभव आहे. गेल्या वर्षी कांही कामानिमित्त मी ११ महिने अलिबागला राहिलों होतों, औषधाशिवाय रोग बरा करण्याचा व्यासंग व छंद असल्याने त्या ठिकाणीं "श्री साई निसर्गोपचार केंद्र" अशी पाटी लावली. अलिबाग हें कुलाबा जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असलें, तरी तेथील वस्ती ८ हजारापेक्षा जास्त नाही. तेवढयाशा वस्तींतदेखील एक सरकारी दवाखाना, सहा मेडिकल प्रॅक्टिशनर्स व दोन वैद्य येथे रोग निवारण्याचा धंदा करतात व आमचा धंदा चांगला चालला आहे असें म्हणतात.

माझ्या तेथील वास्तव्यांत मी सर्वप्रकारच्या एकूण १८४ लोकांना उपचार केले. त्यापैकी जवळजवळ १६२ लोक निखालस बरे झाल्याची नोंद मजकड आहे. या सर्व रोग्यांपैकी जवळजवळ ७० लोक तरी बद्धकोष्ठता व तदनुषंगिक रोगांनी, म्हणजे मूळव्याध, अतिसार, मलावरोध, आव या विकारांनी पीडलेले होते. माझ्या उपचाराने ७० पैकी ६२ रोगी संपूर्णतया बरे झाले. मी हकीम, वैद्य, डॉक्टर व आयुर्वेद विशारद किंवा धन्वन्तरी नाहीं, परंतु निसर्गोपचाराने रोग बरे होतात, करतां येतात यावर श्रद्धा ठेवून प्रयत्न करणारा एक प्रयत्नवादी मनुष्य आहें.

बद्धकोष्ठतेवर आजवर मी पुढील उपचार सुचवीत आलों आहें.

(१) खजुराच्या चार बिया ग्लासभर पाण्यांत कुसकरून तें झोपतांना प्यावें. थोड्याच दिवसांत बद्धकोष्ठता जाते.

(२) रात्रीं तांब्याच्या भांड्यांत झाकून ठेवलेलें पाणी सकाळीं उठल्याबरोबर चूळ भरून टाकून ग्लासभर प्यावें, प्रथम सर्दी झाल्यासारखें वाटेल परन्तु थोड्याच दिवसांत कोठा साफ राहूं लागेल.

(३) दोन प्रहरीं जेवण झाल्यावर पिकलेले दोन पेरू बियासुद्धा चावून चावून खावेत.

(४) झोपतांना २–३ सुकीं अथवा ओलीं अंजिरें चावून खाऊन त्यावर ग्लासभर पाणी प्यावें.

(५) दोन प्रहरच्या जेवणांत चपाती, तोंडी लावण्यास मध व मेथीची गोळाभाजी खाल्ल्यास बद्धकोष्ठता नाहीशी होईल.

(६) संध्याकाळच्या जेवणांत तुरीच्या डाळी बरोबरीने मेथ्या घालून शिजवलेली आंब्याएवढी उसळ खाऊन बघा.

(७) सकाळीं उठल्याबरोबर ग्लासभर पाण्यांत लिंबू पिळून तें घेऊन पहा.

(८) कांही दिवस झोपण्यापूर्वी चिमटभर ओवा खाऊन त्यावर पाणी प्या.

(९) रोज मूठभर मनुका चावून चावून खाऊन त्यावर ग्लासभर पाणी प्यावें.

(१०) गांवठी गुलाबाच्या पाकळ्या चावून चावून कांहीं दिवस खाऊन पाहा.

(११) डोक्याखाली उशी घेऊन उताणें निजा. हळू हळू पाय उचलत नेऊन डोक्यावरून मागे जमिनीला टेकवा, तसेंच अर्धे उठून डोकें गुडघ्याला लावा. त्याचप्रमाणे पोटावर पालथें निजून मागचे पाय हाताने धरून सी–सॉ सारखे २–३ वेळां तरी नियमित करा. यापूर्वी ग्लासभर पाणी पिणें हितकारक ठरतें.

(१२) भाजाणीची भाकरी खाऊन त्यावर ताक प्यावें.

(१३) सायंकाळच्या जेवणांत भात व मुगाचीं टरफलें न काढलेलें कमी-तिखट–मिठाचें नित्य वरण खावें किंवा नियमाने मुगाचे लाडू खाऊन त्यावर पाणी प्यालें तरीहि पुष्कळ फायदा होतो.

(१४) सुपारीची बारीक पूड करून ती तोंडांत टाकून त्यावर पाणी पिल्यास शौचास साफ होतें.


शहरांत बद्धकोष्ठतेचा विकार पुष्कळ प्रमाणांत आढळतो. कोठा साफ नसलेल्या माणसाला केव्हांच हुरूप वाटत नाही. तो कसेतरी दिवस ढकलीत असतो. कोठ्यांत घाण साचूं देणें म्हणजे कोणत्याहि विकाराला शरिरांत प्रवेश करण्यास परवानगी देण्यासारखें आहे. म्हणून कोठा साफ ठेवणें हें निरोगीपणाचें सर्वांत मोठें व महत्त्वाचें काम होय.

●●●

**सूचना :**

**'आपलें एंजिन' या लेखमालेंतील लेखांक ५ वा कांही अपरिहार्य कारणामुळे या अंकांत प्रसिद्ध करण्यांत आला नाही. पुढील अंकीं तो येईल.**




लोकराज्याचें
स्वप्न
साकार झालें
१ मे १९६२ पासून
महाराष्ट्रांत सर्वत्र
पंचायत राज्य
महाराष्ट्राच्या विकासासाठीं
आपण हा प्रयोग
यशस्वी करूं या
महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि खात्यातर्फे प्रकाशित

# एक हृदय हो भारत जननी...........

'काळापुट्ट', 'आनंदबाजार', 'इनामाय', 'सौभाग्य' हा प्रकार काय आहे?

'यक्षगान'; 'भांगडा', 'गरबा'.......हे शब्द आपल्या कानांवरून कधीतरी गेले असतील.

पण 'कोळम', 'साथीयो', 'अल्पना', 'मुमु'......ह्या नांवांशी आपला परिचय आहे का?

'गर्वी गुजरात', 'प्यारो राजस्थान', 'उदय कन्नड' हीं गाणीं कधी ऐकलीं-वाचलीं आहेत का?

यासाठी आपणाला 'माणूस'चा जूनचा वर्षारंभ अंक पाहावा लागेल.

११ जून हा आंतरभारती-दिन म्हणून महाराष्ट्रांत सर्वत्र साजरा होत असतो. या दिनानिमित्त भारतीय जीवनाच्या एकात्मतेचें दर्शन घडविणाऱ्या प्रांतोप्रांतीच्या लोककथा, चालीरीति, संस्कृतिविशेष

यांचा मनोज्ञ संग्रह 'माणूस' वाचकांसमोर प्रस्तुत करीत आहे.

शिवाय

शरदिंदु बंदोपाध्याय, कृष्णचंद्र जैतिकी, अंबु के. वशी, जनाब उमर नय्यर साहब, बीचीबाबू इत्यादि आपल्यामधील परप्रांतीय नामवंत साहित्यिकांचे परिचय.

वार्षिक वर्गणी आठ रुपये : मूल्य एक रुपाया : पृष्ठें ५६

'माणूस' कार्यालय, ४१९ नारायण पेठ, पुणें २.

संपादक-मुद्रक-प्रकाशक : श्री. ग. माजगांवकर, प्रकाशन स्थळ : राजहंस प्रकाशन, १०१५ सदाशिव पेठ, पुणे २.
मुद्रक : साधना प्रेस, ४३०-३१ शनवार पेठ, पुणे २.